RNI No.: MAHBIL/2016/68485
www.acrossstates.com
पोस्टाचा परवाना क्र. MNW/335/2018-20

मराठी
# अक्रॉस मुंबई
संपादक- संजय मंगेश भैरे

वर्ष: ९ अंक : ४४ ■ मुंबई, मंगळवार १ ते ७ ऑक्टोबर '२४
मूल्य - ५.०० रुपये पाने - ८


**मुंबई विद्यापीठ सिनेट निवडणुकीने ठाकरे सेनेत भरले बळ, पण जागावाटपात काँग्रेसच्या पोटात येणार कळ!**

पान 2 पाहा

**मला मुख्यमंत्री व्हायचे आहे, पण वारंवार उपमुख्यमंत्रीपदावर अडकतो- अजित पवार**

पान 3 पाहा

## श्रीक्षेत्र सिद्धगिरी महासंस्थान , कणेरी मठ, कोल्हापूर येथे महाराष्ट्रातील हजारो संत-महंत, धर्माचार्य यांचा दोनदिवसीय भव्य "संत समावेश"






■ कोलाहापूर

श्रीक्षेत्र सिद्धगिरी मठ महासंस्थान, कणेरी, कोल्हापूर येथे सोमवार, दि. ३० सप्टेंबर व मंगळवार, दि.१ ऑक्टोंबर २०२४ रोजी महाराष्ट्रातील सर्व संप्रदायातील संतांचे भव्य "संत समावेश" कार्यक्रमाचे श्रीक्षेत्र सिद्धगिरी मठाच्या पावन भूमीत आयोजन करण्यात आले आहे. या प्रसंगी मा.मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे, मा.उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व मा.उद्योगमंत्री उदय सामंत यांच्यासह आध्यात्म क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

महाराष्ट्र हि संतांची भूमी म्हणून ओळखली जाते. या संतांच्या दिव्य परंपरेला उज्वल असा वारसा आहे तोच वारसा आज हजारो संत, महंत, मठाधिपती, धर्माचार्य, किर्तनकार, प्रवचनकार चालवत आहेत. प्रत्येक अध्यात्मिक प्रमुख आपल्या परीने समाज प्रबोधनाचे कार्य करत आहे. हि सृजन शक्ती एकत्रित यावी व त्यातून समाजाच्या सर्वांगीण विकासाचे नवनीत निघावे यासाठी श्रीक्षेत्र सिद्धगिरी महासंस्थांचे मठाधिपती पुज्यश्री काडसिद्धेश्वर महास्वामीजी यांच्या संकल्पनेतून या "संत समावेश" कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

या दोन दिवसीय "संत समावेश" या कार्यक्रमात एकूण आठ सत्र होणार असून त्यात प्रामुख्याने समाज प्रबोधन, राष्ट्ररक्षण,राष्ट्र उन्नती, समाज उन्नती, धर्मरक्षण आदी विषयांवर सकारात्मक विचार मंथन होणार आहे. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागातील विखुरलेल्या सर्व संप्रदायाच्या घटकांना एकत्रित करून समाजासाठी अमुल्य योगदान देण्यासाठी हि शक्ती प्रवृत्त करणे व मंथन-कृतीतून देश पुनः विश्वगुरु स्तरावर नेण्यासाठी पाउल टाकणे हा या "संत समावेशा" मागचा उद्देश असल्याची माहिती श्रीक्षेत्र सिद्धगिरी महासंस्थानचे विश्वस्त उदय सावंत यांनी दिली. या कार्यक्रमास संपूर्ण महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातून सर्व संप्रदायाचे प्रमुख, साधू, संत, महंत, वारकरी, किर्तनकार , प्रवचनकार, प्रबोधनकार, अध्यात्मिक प्रमुख, मठाधिपती यांच्यासह विचारवंत इत्यादी केवळ निमंत्रित सहभागी होणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.

# निवडणुकीपूर्वी सरकारकडून निर्णयांचा पाऊस
# मंत्रिमंडळाने घेतले 38 महत्त्वाचे निर्णय

## गोमातेला राज्यमातेचा दर्जा; देशी गाईंच्या पालन पोषणासाठी सरकारकडून अनुदान

गोमातेला राज्यमातेचा दर्जा दिल्याचीही माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली आहे. गेल्या आठवड्यातही राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली, त्या बैठकीत तब्बल 24 लोक कल्याणकारी निर्णय घेण्यात आले होते. विशेष म्हणजे आजसुद्धा महायुती सरकारने महत्त्वाचे निर्णय घेतलेत. विधानसभा निवडणुकीला अवघे काही दिवस बाकी असताना महायुती सरकारकडून निर्णयांचा धडाका सुरू असल्याचं चित्र पाहायला मिळतंय. दरम्यान, आज सोनार समाजासाठी 'संत नरहरी महाराज' आर्थिक विकास महामंडळाची राज्य सरकार स्थापना करणार आहे. तर दुसरीकडे सरकारने देशी गाईंच्या पालन पोषणासाठी अनुदान योजना आणली आहे. राज्यातील गोशाळांमधील देशी गायींच्या पालन पोषणासाठी प्रति दिन, प्रति गाय 50 रुपये अनुदान मिळणार आहे.



■ मुंबई

विधानसभा निवडणुकीला अवघे काही दिवस शिल्लक असतानाच सोमवारी राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आलेत. मागील आठवड्यात राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली होती. यावेळी एक दोन नाहीतर तब्बल 24 महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले होते. तर आजदेखील 38 लोक कल्याणकारी निर्णय राज्य सरकारने घेतले आहेत.

यात विशेष म्हणजे मागील बैठकीत राज्यातील सरपंच आणि उपसरपंच यांच्या वेतनात दुप्पट वाढ करण्यात आली होती. त्यानंतर आज कोतवालांच्या मानधनात 10 टक्के वाढ करण्यात आली आहे. तर ग्राम रोजगार सेवकांना आता दर महिन्याला आठ हजार रुपयांचे मानधन देण्यात येणार असल्याचा महत्त्वाचा निर्णय महायुती सरकारने घेतला आहे.

दरम्यान, राज्यातील महायुती सरकार निवडणुकीच्या तोंडावर अनेक महत्त्वाचे निर्णय घेत आहे. सरकारी कर्मचाऱ्यांना आकर्षित करण्यासाठी आणि त्यांना प्रभावित करण्यासाठी हे निर्णय घेतले जात असल्याचा असा आरोप विरोधकांकडून करण्यात येत आहे. विशेष म्हणजे अनुकंपा धोरणही लागू करण्यात आले आहे. याचबरोबर ग्राम रोजगार सेवकांना आता महिन्याला आठ हजार रुपयांचे मानधन दिले जाणार असून, प्रोत्साहन अनुदान मिळणार आहे. या निर्णयामुळं कोतवाल आणि राज्यातील ग्राम रोजगार सेवकांमध्ये आनंदाचे आणि उत्साहाचे वातावरण आहे. एकीकडे लाडकी बहीण योजनामुळे महिलांमध्ये आनंदाचे वातावरण असताना आता राज्य सरकार राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांसाठीसुद्धा अनेक महत्त्वाचे निर्णय घेताना दिसत आहेत.

| बैठकीतील महत्त्वाचे निर्णय |
| --- |
| कोतवालांच्या मानधनात दहा टक्के वाढ, अनुकंपा धोरणही लागू |
| ग्राम रोजगार सेवकांना आता दरमहा ८ हजार रुपये मानधन तसेच प्रोत्साहन अनुदान |
| ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह भुयारी मार्गाच्या कामाला गती देणार |
| एमएमआरडीएला बिनव्याजी दुय्यम कर्ज सहाय्य देण्यास मान्यता |
| ठाणे वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या कामास गती देणार असून, १२ हजार २०० कोटींच्या सुधारित आराखड्यास मान्यता |
| ठाणे ते बोरिवली भुयारी मार्गासाठी १५ हजार कोटी कर्जरूपाने उभारणार |
| देशी गाईंच्या पालन पोषणासाठी अनुदान योजना |
| भारतीय खेळ प्राधिकरणाला आकुर्डी, मालाड आणि वाढवण येथील जागा |
| नॅशनल सेंटर ऑफ एक्सलन्स उभारणार |
| रसायन तंत्रज्ञान संस्थेस ठाणे येथील मौजे खिडकाळीची जागा |
| राज्य जलसंपत्ती माहिती केंद्र स्थापणार, जलस्त्रोतांचे उत्तम नियोजन करणार |
| जळगाव जिल्ह्यातल्या भागपूर उपसा सिंचन योजनेस सुधारित मान्यता, ३० हजार हेक्टर जमीन सिंचित होणार |
| लातूर जिल्ह्यातील हासाळा, उंबडगा, पेठ, कव्हा कोल्हापूर बंधाऱ्याच्या कामास मान्यता |
| धुळ्याच्या बीएपीएस स्वामीनारायण संस्थेस ग्रामस्थांच्या विकासासाठी जमीन |
| रमाबाई आंबेडकर नगर, कामराजनगरच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेला गती देणार |
| एमएमआरडीएला जमीन अधिमूल्य भरण्यास सवलत |
| केंद्राच्या मिठागराच्या जमिनी राज्य शासनाकडे हस्तांतरित करणार, दुर्बलांसाठी घरांच्या योजनांना वेग येणार |
| पालघर जिल्ह्यातील मुरबे येथे बहुउद्देशीय बंदर प्रकल्प जेएसडब्ल्यू इन्फ्रास्ट्रक्चर विकासक विकसित करणार |

## राजकारणापासून किमान देवांना तरी दूर ठेवा : सर्वोच्च न्यायालयाची टिप्पणी

■ नवी दिल्ली



गेल्या काही दिवसांपासून तिरुपती देवस्थान व तेथील प्रसाद अर्थात लाडू चर्चेचा विषय ठरले आहेत. देवस्थानात भाविकांना प्रसाद म्हणून हे लाडू देण्यात येतात. मात्र, लाडू बनवण्यासाठी वापरण्यात आलेल्या तुपामध्ये जनावरांची चरबी आढळल्याचा खळबळजनक आरोप झाल्यानंतर त्यावर बरीच चर्चा होऊ लागली आहे. हे प्रकरण थेट सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेलं असून न्यायालयात यासंदर्भात सुनावणी चालू आहे. या सुनावणीदरम्यान न्यायालयाने महत्त्वपूर्ण टिप्पणी केली आहे.

तिरुपती देवस्थानाच्या प्रसादासंदर्भात चालू असणारा वाद राजकीय मुद्दा होऊ लागला आहे. आधी विद्यमान मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनीच आधीच्या सरकारच्या काळात प्रसादाच्या लाडूंसाठी भेसळयुक्त तूप वापरलं जात होतं असा खळबळजनक आरोप केला. त्यानंतर वायएसआरसीपी अर्थात आंध्र प्रदेशातील आधीच्या सत्ताधारी पक्षाकडून हे आरोप फेटाळण्यात आले. त्यावरून आता एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपांचं राजकारण चालू झालं आहे. यासंदर्भात न्यायालयानं सुनावणीदरम्यान गंभीर भाष्य केलं. तसेच, पुढील सुनावणी तीन तारखेला ठेवली आहे.

न्यायमूर्ती बी. के. गवई व न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी चालू आहे. यावेळी न्यायालयाने "किमान देवांना तरी राजकारणापासून दूर ठेवा अशी अपेक्षा आम्ही करतो", अशी टिप्पणी केली. "हा श्रद्धेचा विषय आहे. जर भेसळयुक्त तूप वापरलं गेलं असेल, तर ते अजिबात स्वीकारार्ह नाही", असा युक्तिवाद सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी न्यायालयासमोर केला.

तुषार मेहता यांच्या युक्तिवादावर न्यायमूर्तींनी यासंदर्भातल्या पुराव्याची मागणी केली. "प्रसादाचे लाडू तयार करण्यासाठी भेसळयुक्त तूप वापरलं गेलं होतं, याचा काय पुरावा आहे?" अशी विचारणा यावेळी न्यायालयाने केली.

## मिथुन चक्रवर्ती यांना दादासाहेब फाळके पुरस्कार

■ मुंबई

बॉलीवूडमधील ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांना भारतीय चित्रपटसृष्टीतील योगदानाबद्दल दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. 08 ऑक्टोबर 2024 रोजी 70 व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सोहळ्यात मिथुन चक्रवर्ती यांना दादासाहेब फाळके पुरस्कार प्रदान केला जाईल. मिथुन चक्रवर्ती यांना दादासाहेब फाळके पुरस्कार देण्याची घोषणा केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ट्विटरवर लिहिले की, मिथुन दा यांच्या सिनेमॅटिक प्रवासाने प्रत्येक पिढीला प्रेरणा दिली आहे. दादासाहेब फाळके निवड ज्युरीने मिथुन चक्रवर्ती यांना भारतीय चित्रपटसृष्टीतील महत्त्वपूर्ण योगदानाबद्दल सन्मानित करण्याचा निर्णय घेतला आहे हे जाहीर करताना मला सन्मान वाटतो. उल्लेखनीय आहे की 1976 साली प्रदर्शित झालेला मृगया हा अभिनेता मिथुन चक्रवर्तीच्या सिने करिअरमधील पहिला चित्रपट होता. या चित्रपटात त्यांनी मृगया या संथाली तरुणाची भूमिका साकारली होती जो ब्रिटीश सरकारकडून आपल्या पत्नीच्या लैंगिक शोषणाविरोधात आवाज उठवतो. या चित्रपटातील दमदार अभिनयासाठी त्यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. कलाक्षेत्रातील विशेष योगदानाबद्दल मिथुन चक्रवर्ती यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. मिथुन चक्रवर्ती यांनी त्यांच्या फिल्मी करिअरमध्ये 350 हून अधिक चित्रपटांमध्ये काम केले आहे. मिथुन चक्रवर्ती अजूनही उत्साहाने चित्रपटांमध्ये काम करत आहेत.

## कोतवाल, ग्राम रोजगार सेवकांना दिलासा! मानधन वाढीसह अनुदान मिळणार

■ मुंबई

राज्यातील कोतवालाना मानधन वाढीसह अनुकंपा धोरण तर ग्राम रोजगार सेवकांना दरमहा ८ हजार रुपयांचे मानधन देण्याचा निर्णय सोमवारी राज्य मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. या निर्णयामुळे कोतवाल आणि ग्राम रोजगार सेवकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

राज्यात १२ हजार ७९३ कोतवालांना याचा लाभ मिळणार आहे. त्यांना मिळणाऱ्या १५ हजार रुपये इतक्या मानधनात ही वाढ दिली जाणार आहे. तसेच सेवेत असताना मृत्यू झाल्यास, किंवा गंभीर आजार, अपघात यामुळे असमर्थ ठरल्यास शासनाच्या अनुकंपा धोरणानुसार त्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती दिली जाईल. या संदर्भातील धोरणाला मान्यता देण्यात आली. शिवाय राज्यातील ग्राम रोजगार सेवकांना दरमहा आठ हजार रुपये मानधन तसेच प्रोत्साहन अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. ग्रामपातळीवर ज्या ग्रामरोजगार सेवकांनी २ हजार पेक्षा जास्त दिवस काम पूर्ण केले आहेत. त्यांना मजुरी खर्चाच्या एक टक्के प्रोत्साहन अनुदान दिले जाईल. दोन हजार दिवसांपर्यंत काम केलेल्या ग्रामरोजगार सेवकांना दर महिना एक हजार रूपये व दोन हजार एक पेक्षा जास्त दिवस काम करणाऱ्या ग्राम रोजगार सेवकांना दरमहा दोन हजार रुपये प्रवास भत्ता व डेटा पॅक करिता अनुदान देणार, असा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेतला आहे.

## अक्षय शिंदेचा मृतदेह प्रचंड पोलिस बंदोबस्तात दफन



■ उल्हासनगर

बदलापूर येथील लैंगिक अत्याचार प्रकरणात आरोपी असलेला अक्षय शिंदे याचा पोलिसानी एनकाऊंटर केला असुन त्याचा मृतदेह दफन करायला बदलापूरसह आजुबाजुच्या शहरांत विरोध होत असतानाच उल्हासनगर येथील शांतीनगर स्मशानभूमीत पोलिस प्रचंड बंदोबस्तात अक्षय शिंदेचा मृतदेह दफन करण्यात आला आहे. यावेळी शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यानी दफन करण्यास तीव्र केला आहे. तेव्हा पोलिसानी या पदाधिकाऱ्याना ताब्यात घेऊन पोलिस ठाण्यात नेले. दरम्यान भाजपाचे शहर अध्यक्ष प्रदिप रामचंदानी यांना सुद्धा पोलिसानी ताब्यात घेतले आहे. पोलिस बंदोबस्तात अक्षय शिंदेचा मृतदेह दफन करण्यात आला आहे. यावेळी त्याचे आई वडील यांच्या सह त्याचे नातेवाईक करमाळा गुलबर्गा येथुन आले असुन त्यांच्या उपस्थितीत त्याचा दफन विधी संपन्न झाला. मात्र यावेळी पोलिसानी स्मशानभुमीत पत्रकाराना जाण्यास मज्जाव केल्याने पत्रकारानी नाराजी व्यक्त केली आहे.

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे यांचा मुंब्रा येथे एनकाऊंटर करण्यात आला असुन त्याला दफन करण्यासाठी बदलापुरसह अंबरनाथ मध्ये तीव्र विरोध झाला. अखेर हायकोर्टाच्या आदेशाने अक्षय चा मृतदेह सोमवार पर्यंत दफन करा असा शासनाला आदेश दिले. अखेर त्याचा मृतदेह दफन करण्या साठी उल्हासनगर कॅंप ३ शांतीनगर येथील स्मशानभुमीत जागा बघुन दफन करण्याचा निर्णय त्याच्या आई वडीलानी घेतला. दरम्यान ही माहीती उल्हासनगर च्या शिवसेना पदाधिकाऱ्याना समजताच महानगर प्रमुख राजेंद्र चौधरी बाळा श्रीखंडे, सुनिल सिंग यांच्या सह शेकडो पदाधिकारी यांनी शांतीनगर स्मशानभुमीत जावुन शिंदे चा मृतदेह दफन करण्यास विरोध केला . तर भाजपाचे शहर अध्यक्ष प्रदिप रामचंदानी व त्यांचे काही पदाधिकारी यांनी सुध्दा विरोध केल्याने पोलिसानी त्यांच्यावर लाठीमार केला.दरम्यान रामचंदानी यांनी सरकारचा निषेध केला असुन उल्हासनगर ही संताची भुमी आहे. या भुमीत बलात्काऱ्याचा दफन विधी होतो ही निषेधार्थ बाब आहे असे बोलुन आपल्याच सरकारचा निषेध केला आहे. मात्र अखेर प्रचंड पोलिस प्रचंड बंदोबस्तात अक्षय शिंदे यांचा मृतदेह दफन करण्यात आला . दरम्यान यावेळी उल्हासनगर कॅंप ३ येथील शांतीनगर स्मशानभुमीला पोलिस छावणीचे स्वरुप आले होते. तर रोडवर नागरिकानी प्रचंड गर्दी केल्याने पोलिसानी त्यांच्यावर लाठ्या उगारत पळवुन लावले.

## पंतप्रधान मोदींच्या हस्ते पुणे मेट्रोचे लोकार्पण
## राज्यातील 11,200 कोटींच्या विकासकामांचे उद्घाटन





■ पुणे

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज (29 सप्टेंबर) व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे महाराष्ट्रासाठी 11,200 कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या विविध प्रकल्पांचं लोकार्पण केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले "आज भगवान विठ्ठलाच्या आशीर्वादाने त्यांच्या भाविकांना आपुलकीची भेट मिळाली आहे. सोलापूरला थेट हवाई जोडणी देण्यासाठी विमानतळाच्या अद्ययावतीकरणाचे काम पूर्ण झालं आहे. प्रवाशांसाठी नवीन सुविधा निर्माण करण्यात आल्या आहेत. पुण्याच्या वाढत्या लोकसंख्येमुळे त्याची गती कमी होऊ नये, यासाठी आपण सक्रिय पावले उचलली पाहिजेत." पुढे पंतप्रधान म्हणाले, "दोन दिवसांपूर्वी मला अनेक मोठ्या प्रकल्पांच्या उद्घाटनासाठी आणि पायाभरणीसाठी पुण्यात येण्याचे नियोजन होते. परंतु अतिवृष्टीमुळे मला तो कार्यक्रम रद्द करावा लागला. यामुळे माझे नुकसान झाले आहे. कारण पुण्यात आल्यामुळे उत्साह येतो. जिल्हा न्यायालय ते स्वारगेट सेक्शन मार्गावर आता मेट्रो सुरू होणार आहे."

पंतप्रधान कार्यालयानं (पीएमओ) शनिवारी (28 सप्टेंबर) दिलेल्या माहितीनुसार, पंतप्रधान मोदी जिल्हा न्यायालय ते स्वारगेट या पुणे मेट्रो विभागाचं उद्घाटन केले. यासह पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्प (फेज-1) पूर्ण होईल. जिल्हा न्यायालय ते स्वारगेट दरम्यानच्या भुयारी भागाची किंमत अंदाजे 1,810 कोटी रुपये आहे. पुणे मेट्रो फेज-1 च्या स्वारगेट ते कात्रज विस्ताराची पायाभरणीदेखील पंतप्रधान मोदी करणार यांनी केली. यासाठी अंदाजे 2,955 कोटी रुपये खर्च येणार आहे. अंदाजे 5.46 किमीचा हा दक्षिण विभाग मार्केट यार्ड, पद्मावती आणि कात्रज या तीन स्थानकांसह पूर्णपणे भूमिगत आहे.

राष्ट्रीय औद्योगिक कॉरिडॉर विकास कार्यक्रमांतर्गत 7,855 एकर क्षेत्र व्यापणारा बिडकीन औद्योगिक क्षेत्र आज पंतप्रधान मोदी राष्ट्राला समर्पित करणार आहे. हे छत्रपती संभाजीनगरच्या दक्षिणेस 20 किलोमीटर अंतरावर आहे. दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरिडॉर अंतर्गत विकसित करण्यात आलेल्या या प्रकल्पात मराठवाडा विभागातील एक वायब्रंट इकोनॉमिक हब म्हणून प्रचंड क्षमता असल्याचं पीएमओनं म्हटले आहे. केंद्र सरकारनं 6,400 कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या या प्रकल्पाला तीन टप्प्यांत विकासासाठी मंजुरी दिली आहे.

## मनोज जरांगेंचा दसरा मेळावा होणारच, बैठकीत झाली घोषणा

■ बीड

दसऱ्यादिवशी मेळावा घेण्याची महाराष्ट्राला मोठी परंपरा आहे. त्यात शिवतीर्थावरील शिवसेनेचा दसरा मेळावा असो की भगवानगडावरील पंकजा मुंडे यांचा मेळावा असो यात आता आणखी एका मेळाव्याची भर पडली आहे. ती म्हणजे यावर्षीपासून नारायण गडावर ते मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीमध्ये दसरा मेळावा होणार आहे. मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे नारायणगडावरून रणशिंग फुंकले असून जरांगेंनी या बैठकीत तशी घोषणा केली. या मेळाव्याच्या नियोजनाची बैठक आज नारायणगडावर पार पडली. या बैठकीसाठी मराठा कार्यकर्त्यांची मोठी हजेरी होती. या बैठकीमध्ये कोणत्या ठिकाणी हा दसरा मेळावा होईल त्या ठिकाणी आलेल्या लोकांची बसण्याची व्यवस्था असेल त्यानंतर पार्किंगची व्यवस्था असेल अशा सगळ्या कामाचा गावानिहाय वाटप या बैठकीमध्ये करण्यात आले आहे. राज्यात दसरा मेळाव्याची अनेक ठिकाणी परंपरा आहे. बीडच्या सावरगाव घाट मध्ये पंकजा मुंडे यांचा दसरा मेळावा प्रसिद्ध आहे. आता नारायणगडावर मनोज जरांगे पाटील दसरा मेळावा घेणार आहेत. याच पार्श्वभूमीवर आज नारायणगडावर मराठा समन्वयकांची बैठक आयोजित करण्यात आलीय. आज दुपारी तीन वाजता या बैठकीचे आयोजन करण्यात होते. या बैठकीतच मनोज जरांगेंनी हा निर्णय घेतला आहे. आठवडाभर उपोषण करुनही सरकारने आमच्या मागण्या मान्य केल्या नाहीत. त्यामुळे आता पुढील लढाई निवडणुकीची असेल, असे संकेत मनोज जरांगे यांनी दिले होते. त्यानंतर आता बीडमध्ये मनोज जरांगे पाटील यांच्या दसरा मेळाव्याची घोषणा झाल्यानं विधानसभा निवडणूसाठी मनोज जरांगे यांनी रणशिंग फुंकल्याचं दिसतंय.

# भाजप मित्रपक्षांना सन्मानाचीच वागणूक देतो राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांचा दावा



■ मुंबई

महायुती मध्ये अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसचे महत्व कमी झाल्याच्या कपोलकल्पित बातम्या गेले काही दिवस आमच्या हितचिंतकांनी देण्याचा प्रयत्न केला असला तरी भाजप आपल्या मित्रपक्षांना सन्मानपूर्वकच वागणूक देतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे माझी केंद्रीय समिती अध्यक्ष पदावर झालेली निवड आहे,अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खा.सुनिल तटकरे यांनी विरोधकांच्या टिकेतील हवाच काढून टाकली.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांची केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक गॅस समितीच्या अध्यक्षपदी शुक्रवारी निवड झाल्यानंतर शनिवारी प्रदेश कार्यालयात आले असता त्यांचे ढोलताशांच्या गजरात जंगी स्वागत करण्यात आले.त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी बोलताना मित्रपक्ष भाजपचे भरभरून कौतुक केले.

लोकसभेत मला जी समिती दिली आहे त्या समितीची जबाबदारी फार मोठी असून त्या समितीच्या कामकाजाबद्दल आताच सांगणे योग्य नाही. कारण ही समिती लोकसभेच्या अखत्यारीत येते. मात्र या समितीचे काम योग्यरितीने करण्याचे सातत्य माझ्याकडून ठेवले जाईल अशी ग्वाहीही तटकरे यांनी दिली.

राज्यात जी विविध महामंडळे आहेत त्यावर नियुक्त्यांसंदर्भात योग्य ती कार्यवाही सुरू आहे. त्यामूळे काही कारणास्तव निवड करण्यास विलंब झाला असला तरी काही दिवसातच माझ्या महत्वाच्या सहका-यांना काम करण्याची संधी मिळेल असा विश्वासही तटकरे यांनी व्यक्त केला.

यावेळी पक्षाचे कोषाध्यक्ष आमदार शिवाजीराव गर्जे, मुंबई कार्याध्यक्ष नरेंद्र राणे, प्रदेश प्रवक्ते आनंद परांजपे, प्रदेश प्रवक्ते संजय तटकरे, प्रदेश सरचिटणीस लतिफ तांबोळी, मुंबई बँकेचे उपाध्यक्ष सिध्दार्थ कांबळे, मुंबई युवक अध्यक्ष सुनिल गिरी, आदींसह पक्षाचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुंबई विद्यापीठ सिनेट निवडणुकीने ठाकरे सेनेत भरले बळ, पण जागावाटपात काँग्रेसच्या पोटात येणार कळ!

■ मुंबई

मुंबई विद्यापीठातल्या सिनेटच्या निवडणुकीने ठाकरे सेनेत भरले बळ, या निवडणुकीत अभाविप झाली पराभूत, पण काँग्रेसच्या पोटात आली कळ!!, असे म्हणायची वेळ आली आहे. कारण मुंबई शहरामध्ये उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेत कुठल्याही छोट्या मोठ्या निवडणुकीत यशाचे बळ भरले गेले, की त्याचा परिणाम महाविकास आघाडीतल्या जागा वाटपावर होणार आणि त्याचा फटका काँग्रेसला जास्त बसणार हे उघड गुपित आहे.

वास्तविक कुठल्या विद्यापीठाची सिनेट निवडणूक ही मतदार संख्येने फार मोठी नसते. पण ही तरुणांची निवडणूक असल्यामुळे त्याची वातावरण निर्मिती मात्र नेहमीच कायम मोठी होत असते. सगळ्या राजकीय पक्षांच्या विद्यार्थी संघटना त्यात उतरून आपापल्या पक्षांचे बळ आजमावत असतात.

मुंबई विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीत अभाविपने युवा सेनेला आव्हान दिले होते. बरीच न्यायालयीन लढाई त्यात झाली होती. त्यामुळे विधानसभा अथवा लोकसभेसारखी निवडणूक असल्याच्या थाटात ती लढवली गेली होती. मुंबई विद्यापीठाच्या सिनेट निवडणुकीत १३,४०६ एवढेच मतदार होते. त्यापैकी ५५% मतदारांनी मतदान केले होते. म्हणजे साधारण ७५०० मतदारांनी मतदानात भाग घेतला होता. या निवडणुकीत युवा सेनेने बाजी मारली १० पैकी १० जागा जिंकल्या. त्यामुळे ठाकरे सेनेत बळ भरले गेले. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद पराभूत झाली.

युवा मतदार आमच्याकडे म्हणून जास्त जागा देखील आमच्याकडे

पण या निवडणुकीचा त्याच्या पुढचा परिणाम म्हणून काँग्रेसला आता जोश भरलेल्या ठाकरे सेनेशी विधानसभा निवडणुकीच्या जागा वाटपाच्या वाटाघाटी कराव्या लागणार आहेत. एक - एक, दोन - दोन जागांच्या संघर्षात ठाकरे सेना विद्यापीठातल्या सिनेट निवडणुकीतल्या आपल्या यशाकडे बोट दाखवून काँग्रेस कडून जास्त जागा खेचायचा प्रयत्न करणार आहे. मुंबईतला युवा मतदार ठाकरे सेनेकडे कसा आकर्षित झाला, याचे उदाहरण म्हणून सिनेटच्या निवडणुकीकडे बोट दाखवायला ठाकरे सेना मोकळी झाली आहे. त्यामुळेच या निवडणुकीत अभाविप पराभूत झाली, तरी राजकीय कळ मात्र काँग्रेसच्या पोटात आली आहे.

# एकाच घरात भाजप किती जणांना उमेदवारी देणार?
## निलेश राणेंच्या उमेदवारीवरून महायुतीत अडचणी

■ मुंबई

विधानसभा निवडणुकीची सर्वच पक्षांनी तयारी सुरु केली आहे. दरम्यान माजी खासदार निलेश राणे यांनी आमदारकी लढवण्यासंदर्भात सूचक वक्तव्य केले आहे.यावेळी निलेश राणे विधानसभेत दिसणार असे सांगत, विधानसभा निवडणूक लढणारच असे त्यांनी म्हंटले आहे. मात्र कोणत्या मतदार संघातून ते लढणार हे अजूनही स्पष्ट नाही. मात्र त्यांच्या निवडणूक लढण्याच्या घोषणेमुळे महायुतीत आणि भाजप अंतर्गतही अनेक अडचणी येवू शकतात, अशी चर्चा आहे.

**लोकसभेला झाले तेच विधानसभेला होईल का ?**

राणे कुडाळ-मालवण विधानसभा मतदार संघातून तयारी करत आहेत. हा मतदार संघ तसा शिवसेनेचा आहे. त्यामुळे जागा वाटपात तो भाजपसाठी सुटेल का हा खरा प्रश्न आहे. लोकसभेला शिवसेना शिंदे गटाने आपल्या कोट्यातली जागा नारायण राणे यांच्यासाठी सोडली. त्यानंतर कुडाळ मालवणचीही जागा शिंदे राणेसाठी सोडणार का ? यावर निलेश राणे यांचे भवितव्य अवलंबून आहे.

**निष्ठावंतांची होत आहे घुसमट**

दरम्यान एकाच घरात उमेदवारी किती जणांना दयायची हा प्रश्नही भाजप समोर असणार आहे. घराणेशाही विरोधात नेहमीच भाजपमध्ये बोलले जाते. स्थानिक भाजप पदाधिकारीही सर्वच राणेंना देणार तर मग आम्हाला काय ? असा प्रश्न उपस्थित करत आहेत. जे निष्ठावंत भाजप कार्यकर्ते आहेत त्यांची मात्र यात घुसमट होत असल्याचीही चर्चा आहे.

निलेश राणे हे कुडाळ मालवण मतदार संघात तयारी करत आहेत. इथे ठाकरे गटाचे वैभव नाईक सध्या आमदार आहेत. हा मतदार शिवसेनेचा आहे. त्यामुळे इथून शिंदे ही जागा सोडणार का ? हा खरा प्रश्न आहे.

# समरजितसिंह घाटगे यांची नियुक्ती रद्द

■ मुंबई



विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर भाजपला रामराम ठोकून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केलेले कागल येथील नेते समरजितसिंह घाटगे यांची कोल्हापूर जिल्हा नियोजन समितीवरील (डीपीडीसी)नामनिर्देशित सदस्य म्हणून असलेली नियुक्ती रद्द करण्यात आली आहे. घाटगे यांच्यासह माजी आमदार बजरंग देसाई यांचे चिरंजीव राहुल यांची नियुक्तीही रद्द करण्यात आली आहे. नियोजन विभागाने शुक्रवारी यासंदर्भात शासन निर्णय जारी केला.

महायुतीत कागल विधानसभेची ाागा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पक्षाला जाणार असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर घाटगे यांनी भाजपच्या ग्रामीण जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा देत राष्ट्रवादी शरद पवार गटाची तुतारी हाती घेतली. घाटगे यांनी भाजपला सोडचिठ्ठी दिल्याने अजित पवार यांच्याकडील नियोजन विभागाने त्यांची कोल्हापूर डीपीडीसीवरील नियुक्ती रद्द केली आहे. राज्य सरकारने आता कोल्हापूर जिल्हा नियोजन समितीवर डॉ. सुभाष जाधव आणि ॲड. हेमंत कोलेकर यांची विशेष निमंत्रित म्हणून नियुक्ती केली आहे.

**राजन पाटील यांची नियुक्ती**

दरम्यान, महाराष्ट्र राज्य सहकारी परिषदेच्या अध्यक्षपदी सोलापूर जिल्ह्यातील मोहोळचे माजी आमदार राजन पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सहकार विभागाने शुक्रवारी यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला. पाटील यांची नियुक्ती २७ सप्टेंबर २०२४ पासून पुढील तीन वर्ष अथवा सरकारचा पुढील आदेश येईपर्यंत असेल, असे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे. राजन पाटील हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटात आहेत.

# एमटीडीसीच्या जागा बिल्डरांच्या घशात घालण्याचा डाव अंबादास दानवे यांचा आरोप

■ मुंबई

भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याशी संबंधित शैक्षणिक संस्थेला दिलेल्या भूखंडाचे प्रकरण ताजे असताना आता महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या ३० रिसॉर्टच्या इमारती मोकळया जमिनींसह बिल्डरांच्या आणि भूमाफियांच्या घशात घालण्याचा राज्य सरकारचा डाव असल्याचा आरोप विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी शुक्रवारी केला. सरकारी जमिनी स्वस्तात लाटण्याचा हा प्रकार असून प्रचंड नफ्यात असलेल्या मोठ्या शासकीय मालमत्ता कोणाच्या घशात घालायच्या आहेत, याचे उत्तर पर्यटनात शून्य रस असलेल्या पर्यटन मंत्री गिरीश महाजन यांनी द्यावे, अशी मागणीही दानवे यांनी केली आहे.

अंबादास दानवे यांनी आज एक्स या समाज माध्यमावर पोस्ट करत एमटीडीसीच्या खासगीकरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. या खासगीकरणाने पहिल्याच टप्प्यात म्हणजे ११ ऑक्टोबर २०२४ पासून ४६ अधिकारी, कर्मचारी आणि २०० इतर चतुर्थश्रेणी मराठी मुला-मुलींची नोकरी जाणार असल्याची भीती दानवे यांनी व्यक्त केली आहे. ही लूट एवढ्यावरच थांबत नाही तर या खासगी उद्योजकांना २० टक्के भांडवली अनुदान, ५ ते १५ वर्षे जीएसटी परतावा, मुद्रांक शुल्कावर प्रचंड सूट, कर्ज घेण्यास हमी अशी खैरात करण्यात आली आहे.

१९९४ साली चिखलदरा येथील रिसॉर्टसाठी कर्जासही एमटीडीसीने हमी दिली होती. या कर्जाची परतफेड न केल्याने येथील रिसॉर्ट खासगी मालकाच्या घशात गेले असताना हा स्वस्तात जमिनी लाटण्याचा प्रकार सरकारने चालवला आहे. जागतिक पर्यटन दिनी भूखंड माफियांना सरकारने घेऊन दिलेले दिवाळीचे हे फटाके आहेत. उडवा आणि विसरून जा.. असा सणसणीत टोलाही दानवे यांनी आपल्या पोस्टमध्ये लगावला आहे.



*राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी आज दादर मुंबई येथील स्वामीनारायण मंदिरास भेट देऊन तेथील नीलकंठ वर्णी यांचे दर्शन घेतले व अभिषेक केला. राज्यपालांनी अक्षर पुरुषोत्तम भगवान, स्वामी नारायण भगवान, हरिकृष्ण महाराज व इतर देवतांचे दर्शन घेतले. यावेळी राज्यपालांनी योगी सभागृह येथे प्रगट ब्रह्मस्वरूप महंत स्वामी महाराजांचे आशीर्वाद घेतले तसेच उपस्थित भक्तांशी संवाद साधला. यावेळी साधू तीर्थस्वरूप दास व साधू निष्काम जीवन उपस्थित होते.*

# लोअर परळमध्ये 548 गाड्यांच्या पार्किंगसाठी 520 कोटी रुपयांची निविदा

**मुंबई, दि. २९ प्रतिनिधी**

लोअर परळमध्ये 548 गाड्यांच्या पार्किंगसाठी बीएमसीने 520 कोटी रुपयांच्या निविदा काढल्या आहेत. याचा अर्थ बीएमसी एका कारसाठी सुमारे 95 लाख रुपये खर्च करेल, जो मुंबईत आतापर्यंतचा सर्वाधिक दर आहे.

या निविदेत कंत्राटदार आणि अधिकारी यांची मिलीभगत असल्याचा आरोप करत आरटीआय कार्यकर्ते अनिल गलगली यांनी ही निविदा रद्द करण्याची मागणी केली आहे. लोअर परळमधील 520 कोटी रुपयांच्या या नवीन कार पार्किंगच्या महागड्या टेंडरमुळे बीएमसीला 300 कोटी रुपयांचे नुकसान होणार असल्याचा आरोप गलगली यांनी केला आहे. या संदर्भात बीएमसीचे अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र प्रतिसाद मिळाला नाही. गलगली यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि बीएमसी आयुक्त भूषण गगराणी यांना पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे की, बीएमसीच्या अधिकाऱ्यांनी मागील तक्रारीकडे लक्ष न देता ही निविदा काढली आहे. लोअर परळमध्ये 548 कारच्या पार्किंगसाठी 520 कोटी रुपयांची नवीन निविदा जारी करण्यात आली आहे, येथे प्रत्येक कारची किंमत 95 लाख रुपये असेल. त्यामुळे या निविदेत 300 कोटी रुपयांचे नुकसान होणार आहे. याआधी बीएमसीने माटुंगा, फ्लोरा फाउंटन आणि वरळी येथील कार पार्किंगसाठी निविदा काढल्या आहेत. फ्लोरा फाउंटनमध्ये 70 कोटी रुपये खर्चून 176 गाड्यांच्या पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. येथील नुकसानभरपाईचा खर्च 39.77 लाख रुपये आहे. वरळीतील 640 कारच्या पार्किंगसाठी 216.94 कोटी रुपये देण्यात आले असून येथे प्रति कारची किंमत 33.90 लाख रुपये आहे. माटुंगा येथे 475 कार पार्किंगच्या बांधकामासाठी 103.87 कोटी रुपये देण्यात आले असून, येथे प्रति कारची किंमत 21.87 लाख रुपये आहे.

# वाळकेश्वर येथील जैन संघ महारथयात्रा राज्यपालांच्या उपस्थितीत रवाना



■ मुंबई

भगवान महावीर यांच्या २५५० व्या निर्वाण महोत्सवानिमित्त मुंबईतील सर्व जैन संघांनी आयोजित केलेल्या महारथ यात्रेला महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी रविवारी (दि. २९) वाळकेश्वर मुंबई येथील श्रीपाल नगर जैन मंदिर येथून झेंडा दाखवून रवाना केले. यावेळी राज्यपालांनी जैन मुनींचे दर्शन घेतले आणि उपस्थित जनसमुदायाला संबोधित केले.

यावेळी कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री मंगल प्रभात लोढा, विश्वस्त रमण शहा, हिऱ्यांचे व्यापारी भरत शहा, हितेंद्र मोटा आदी उपस्थित होते.

# दिवाळी आणि छठ पुजेला 6000हून अधिक विशेष गाड्या धावणार



■ मुंबई

भारतीय रेल्वेने दुर्गा पूजा, दिवाळी आणि छठ पूजेदरम्यान प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन 6000 हून अधिक विशेष गाड्या चालवण्याची घोषणा केली आहे. सणांच्या काळात प्रवाशांची सुरळीत हालचाल सुनिश्चित करण्यासाठी या विशेष गाड्या 1 ऑक्टोबर ते 30 नोव्हेंबर दरम्यान चालवल्या जातील.

रेल्वे अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, दरवर्षी सणासुदीच्या निमित्ताने विशेष गाड्या चालवल्या जातात, मात्र यंदा त्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ करण्यात आली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यावेळी विशेष गाड्यांची संख्या आणि वारंवारता दोन्ही वाढले आहे.

वाढ होईल. गेल्या वेळी एकूण 4,429 फेऱ्या झाल्या होत्या, तर यंदा 6000 हून अधिक फेऱ्या होणार आहेत. विशेषतः उत्तर प्रदेश आणि बिहारकडे जाणाऱ्या लाखो प्रवाशांना लक्षात घेऊन रेल्वेने हे पाऊल उचलले आहे. सणासुदीच्या काळात बहुतांश गाड्यांमधील तिकिटे काही महिने आधीच प्रतीक्षा यादीत जातात, त्यामुळे प्रवाशांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते.

# जेएनपीएच्या 'सीएसआर' उपक्रमांतर्गत काळसूरी आणि साळविंडे गावात कृषी-आधारित उत्पादनांवर महिला शेतकऱ्यांचे कौशल्य प्रशिक्षण उपक्रम



■ पोलादपूर

जवाहरलाल नेहरू पोर्ट ऑथॉरिटीच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी अंतर्गत सामाजिक संस्था सस्टेनेबल ॲक्शन टुवर्ड ह्युमन एम्पॉवरमेंट (साथी) यांचे मार्फत जेएनपीए-सक्षम प्रकल्प राबवित आहे; ज्यामध्ये महिला शेतकऱ्यांना त्यांची अंगीभूत कौशल्ये आणि क्षमता सुधारण्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षण दिले जात आहे. म्हसळा तालुक्यातील काळसूरी आणि साळविंडे येथे कृषी-आधारित उत्पादनांची प्रक्रिया, क्लस्टर निर्मिती आणि विपणन व्यवस्था यासाठी हा महत्वाकांक्षी प्रकल्प राबविला जात आहे.

साथी सामाजिक संस्थेचे संचालक सौरभ कुमार यांनी यावेळी, महाराष्ट्रातील गरीब स्त्रिया फळे, कडधान्ये आणि तृणधान्ये यांसारखी कृषी आधारित उत्पादने गोळा करून आपला उदरनिर्वाह करतात. तंत्रज्ञानाचे अपुरे ज्ञान, शेतीमालास बाजारपेठ उपलब्ध नसणे, मार्केटिंग यंत्रणा अपुरी, अकार्यक्षम असणे आणि त्यामध्ये शेतकऱ्याचे अधिकाधिक शोषक करण्याकडे कल असतो, या स्वरूपामुळे गरीब महिलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, अशी माहिती देताना जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण आणि साथी या सामाजिक संस्थेने हे काम सुरू केले असून त्याअंतर्गत 200 बहुजन म्हणजेच एससी, एसटी, ओबीसी, आर्थिकदृष्टया दुर्बल घटक व समाजातील महिला शेतकऱ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाणार असून याद्वारे गरीब महिलांच्या क्षमता वाढविण्यात येऊन त्या सक्षम होऊ शकतील. शाश्वत आणि स्वावलंबी पध्दतीने बाजार आणि जागतिक स्पर्धेच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी सक्षम परियोजना अत्यंत महत्वपूर्ण आहे, असेही यावेळी सांगितले.

साथी सामाजिक संस्थेचे संचालक सौरभ कुमार यांनी सांगितले की, आमची संस्था गरीब महिलांना विविध कंपन्यांच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी अंतर्गत स्वयं-सहायता गटांमध्ये संघटित करून आर्थिकदृष्टया सक्षम बनविण्याचे काम करत आहे. लवकरच हे काम पूर्ण होऊन आम्ही महिलांना स्वावलंबी बनवू शकू याचा आम्हाला आनंद आहे, अशी भूमिका आपल्या मार्गदर्शनपर भाषणात व्यक्त केली.

# रेल्वेतून पडून पोलिसाचा मृत्यू

■ मुंबई

शहर आणि उपनगरात बुधवारी रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे उपनगरीय आणि मेल-एक्स्प्रेस गाड्यांमधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. गर्दीमुळे रेल्वेतून पडून झालेल्या अपघातात पोलीस हवालदार समित ज्ञानेश्वर गोंदके यांचा मृत्यू झाला. त्याचा मृतदेह भांडुप परिसरातील पाचव्या ट्रॅकजवळ आढळून आला. हा अपघात गर्दीमुळे झाला की अन्य काही कारणाने झाला याचा तपास पोलीस करत आहेत.

समित हे आई-वडील आणि तीन भावांसह डोबिवलीत राहत होते. समितने 2018 च्या भरतीमध्ये पोलिस दलात प्रवेश केला होता आणि सध्या तो अंधेरी रेल्वे पोलिस स्टेशनमध्ये तैनात होता. बुधवारी रात्री विलेपार्ले रेल्वे स्थानकावर गस्त घालण्याची ड्युटी संपवून ते घरी परतत होते. गुरुवारी सकाळी सातच्या सुमारास नाहूर ते भांडुप दरम्यान एक व्यक्ती जखमी झाल्याची माहिती एका प्रवाशाने रात्रीच्या ड्युटीवर असलेल्या सहायक उपनिरीक्षकांना दिली. भरधाव वेगात असलेल्या ट्रेनमधून पडल्याने तो गंभीर जखमी झाल्यामुळे त्याचा मृत्यू झाल्याचा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे.

# ...तर छगन भुजबळांविरोधात निवडणूक लढवेन ! - हेमंत पाटील

■ मुंबई

राज्यात बहुसंख्येत असलेल्या इतर मागासवर्गीयांच्या समस्या आहे तश्याच आहेत. तथाकथित ओबीसी नेत्यांनी , विशेषत: राज्याचे मंत्री छगन भुजबळ यांनी समाजाच्या मतांचा वापर केवळ आपल्या राजकीय फायद्यासाठी करून घेतला, असा थेट आरोप इंडिया अगेन्स्ट करप्शनचे (आय एसी) राष्ट्रीय अध्यक्ष आणि ओबीसी नेते हेमंत पाटील यांनी शनिवारी (ता.२८) पत्रकार परिषदेतून केला. मराठा आरक्षणासाठी सुरू असलेला मनोज जरांगे पाटील यांच्या लढ्याला पुर्ण समर्थन असल्याचे यावेळी पाटील यांनी जाहिर केले. जरांगे पाटील यांनी संधी दिली, तर तमाम ओबीसी आणि मराठा बांधवांच्या वतीने नाशिक मधून छगन भुजबळांविरोधात आगामी विधानसभा निवडणूक लढवण्यास तयार असल्याचे देखील हेमंत पाटील म्हणाले.भूजबळ आणि काही तथाकथित नेत्यांना धडा शिकवण्यासाठी राज्यभरात त्यांच्याविरोधात समक्ष उमेदवार देण्याचा संघटनेचा प्रयत्न असल्याचे देखील पाटील म्हणाले. जरांगेंनी केलेली ओबीसी आरक्षणातून मराठ्यांना आरक्षण देण्याची मागणी रास्तच आहे. त्यामुळे ओबीसी समाजाने मोठे मन दाखवून जरांगे पाटल्यांच्या या मागणीचे समर्थन करीत त्यांचे नेतृत्व स्वीकारले तर निश्चितच आगामी काळात ओबीसी-मराठा समाजाच्या नेतृत्वाला एक नवीन दिशा मिळेल,असे भाकित देखील पाटील यांनी व्यक्त केले. ओबीसी समाजाच्या तरुणांमध्ये बेरोजगारीच्या वाढत्या प्रमाणामुळे प्रचंड नैराश्य पसरल्याचे चित्र आहे.ओबीसींसाठी असलेल्या केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना थेट नागरिकांपर्यंत पोहचल्या नाहीत. समस्यांचे डोंगर त्यामुळे वाढतच आहे. काही तथाकथित नेत्यांनी आरक्षणाच्या मुद्दयावर ओबीसी विरोधात मराठा असा संघर्ष पेटवण्याचा प्रयत्न केला.परंतु, आता राज्यातील ओबीसी-मराठा बहुजनांना भासणारी सक्षम नेतृत्वाची पोकळी जरांगे पाटीलच भरू शकतात,असा विश्वास यानिमित्ताने पाटील यांनी व्यक्त केले.आगामी विधानसभा निवडणुकीत राज्यातून २५ ओबीसी आमदार निवडून आणण्याचा मानस असून या लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून समाजाला एक प्रबळ नेतृत्व प्रदान करण्यासाठी मराठा आणि ओबीसी बांधव एकजुटीने आणि एक दिलाने लढवणार असल्याचे पाटील म्हणाले. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात जनजागृतीचा कार्यक्रम हाती घेणार असल्याचे पाटील म्हणाले.

# शिवसेना, शेकापमध्ये रस्सीखेच!

## इच्छुक उमेदवारांचा प्रचार सुरू, काँग्रेसचाही दावा

■ मुंबई

विधानसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीत जागा वाटपाची चर्चा सध्या सुरू आहे. ही चर्चा कोणत्याही वादा शिवाय होत असल्याचे आघाडीचे नेते सांगत आहेत. शिवाय ही चर्चा सामंज्यस्याने होत असल्याचेही सांगितले जात आहे.मात्र पडद्यामागे अनेक गोष्टी आणि वाद उफाळून येत आहेत. आता आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्ष आणि समाजवादी पक्ष हे काही जागांवर अडून बसले आहेत. दोन्ही पक्षांनी या जागा सोडण्यास नकार दिला आहे. त्यामुळे आघाडीत पेच निर्माण झाला आहे. यावर तोडगा कसा काढायचा असा मोठा प्रश्न आता निर्माण झाला आहे.

उरण विधानसभा मतदारसंघावर महाविकास आघाडीतील दोन घटक पक्षांनी दावा केला आहे. यामध्ये शिवसेना(ठाकरे गट) व शेकाप यांच्यात रस्सीखेच पहायला मिळत आहे. दोन्ही पक्षाच्या इच्छुकांनी आपल्या प्रचारदेखील सुरु केल्याचे दिसत आहे.काँग्रेसचाही या मतदारसंघावर दावा आहे. असे असले तरी उमेदवारीसाठी शिवसेनेचा क्रम वरचा असल्याची चर्चा आहे.

उरण विधानसभा मतदारसंघातून गेल्या वेळी अपक्ष उमेदवार महेश बालदी यांनी शिवसेनेचे मनोहर भोईर यांचा अवघ्या पाच हजार मतांनी पराभव केला होता. गेल्या पाच वर्षांत पुलाखालून बरेच पाणी गेले आहे. आमदार बालदी अपेक्षेप्रमाणे भाजपला जॉईन झाले आहेत. शिवसेनेत फूट पडली असली तरी नव्या तयार झालेल्या आघाडीत काँग्रेस शेकाप हे दोन नवे भिडू मिळाले आहे. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला घवघवीत मताधिक्य मिळालेले आहे. त्यामुळे महाविकास आघाडी आणि महायुती यांच्यात थेट लढाई झाल्यास महाआघाडीचा उमेदवार निवडून येण्याची संधी आहे. यात शिवसेनेचे माजी आमदार मनोहर भोईर यांचा क्लेम वरचा आहे. मात्र लोकसभेच्या निकालानंतर महाविकासआघाडीतच रस्सीखेच सुरु झाली आहे. शेकापचे म्हात्रे यांनी देखील संधी मिळाल्यास उरणमधून निवडणूक लढण्याची इच्छा प्रकट केली आहे. मी महाविकास आघाडीकडून इच्छुक आहे.

शेकाप नेते जयंत पाटील जो आदेश देतील, त्यानुसार पुढील दिशा ठरविण्यात येईल, असे मत प्रितम म्हात्रे यांनी व्यक्त केले आहे. तर आपण महाविकास आघाडीच्या माध्यमातूनच ही निवडणूक लढविणार असून उमेदवारी संदर्भात जो निर्णय वरिष्ठ घेतील तो आपल्याला मान्य असेल असे मत माजी आ. मनोहर भोईर यांनी व्यक्त केले आहे. तसेच आपण अखेरपर्यंत उद्धव ठाकरे यांच्याशी एकनिष्ठ राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. दरम्यान, महाविकास आघाडीत बिघाडी झाली तर ती भाजपच्या पथ्यावर पडण्याची शक्यता असल्याचे जाणकारांचे मत आहे.

# सार्वजनिक आरोग्य विभागाचा 3200 कोटींचा महाघोटाळा

## स्वच्छतेच्या नावाखाली सरकारी तिजोरीवर आरोग्यमंत्र्यांचा दरोडा

### विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांचा सरकारवर जोरदार हल्लाबोल

■ मुंबई

राज्यात घोटाळ्यांची मालिका थांबत नाहीत. प्रत्येक मंत्री जाता-जाता तिजोरी लुटून खाण्याच्या तयारीत आहे. अनैतिक मार्गाने सत्तेवर आलेली महायुती पुन्हा सत्तेत येणार नाही हे माहित असल्याने फक्त सरकारी तिजोरी साफ करण्याचा एक कलमी कार्यक्रम सध्या सुरू आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाचा भोंगळ कारभार यापूर्वी देखील आम्ही चव्हाट्यावर आणला आहे. परंतु तरी देखील या विभागाच्या मंत्र्यांची भूख काही कमी होताना दिसत नाही. स्वच्छतेच्या नावाखाली सार्वजनिक आरोग्य विभागात 3200 कोटींचा घोटाळा झाला आहे. तिजोरी स्वच्छ करण्याचा सरकारचा हा इरादा आता उघड आहे. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री हे उघड्या डोळ्यांनी बघत आहेत. त्यामुळे यातील मलीदा त्यांच्यापर्यंत जातो की काय असा प्रश्न निर्माण झाला असल्याचा हल्लाबोल विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. त्याचबरोबर आरोग्य विभागाचं हे स्वच्छतेचं टेंडर तातडीने रद्द करून या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरिय चौकशी करण्याची मागणी वडेट्टीवार यांनी केली आहे.

वडेट्टीवार म्हणाले की, दि.21 एप्रिल 2022 रोजी स्वच्छतेच्या टेंडरच्या प्रक्रीयेसाठी प्रशासकीय मान्यता घेण्यात आली होती. राज्यातील आठ सर्कलमध्ये 27 हजार 869 बेडना प्रशासकीय मान्यता घेऊन स्वच्छतेच्या घोटाळ्याला सुरूवात केली गेली. पूर्वी ही प्रशासकीय मान्यता केवळ 77 कोटी 55 लाख 18 हजार रूपयांची होती. सत्ताधारी पक्षाच्या संबंधित लोकांनी हा उद्योग हातात घेतला आणि ही मान्यता 638 कोटींनी 18 सप्टेंबर 2023 रोजी वाढ करून घेतली. यामध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र, इतर सामान्य आरोग्य केंद्रांचा यामध्ये समावेश करण्यात आला. यासाठी 2022 च्या प्र.मा. मध्ये अंतर्गत क्लीनींग 30 रूपये बाह्य क्लीनींग



3 रूपये असा दर निश्चित करण्यात आला होता. सफाई मशीन, कामगार पगार देणे असा हा खर्च दाखविण्यात आला होता. नवीन प्र.मा. 2023 मध्ये अंतर्गत रेट 84 रूपये बाह्य रेट 9 रूपये 40 पेसे असा जाणून बुजून वाढविण्यात आला. ही वाढ 77 कोटीवरून 638 कोटी अशी दहापटीने करण्यात आली. हे टेंडर तीन वर्षांचे असून यामध्ये 2 वर्षानी वाढ करण्यात येण्याची तरतूद आहे. हा सरकारी तिजोरीवर दिवसाढवळ्या घातलेला दरोडा आहे.

वडेट्टीवार म्हणाले की, खरं तर टेंडर काढताना किंवा प्रशासकीय मान्यता देताना बजेट तरतूद असावी लागले. तसा नियम आहे. परंतु हा नियम डावलून बजेटमध्ये फक्त 60 कोटींची तरतूद असताना आर्थिक शिस्तीचा भंग करून टेंडर फुगविले गेले. पहिले टेंडर काढल्यावर 2023 च्या प्रशासकीय मान्यतेविरोधात हायकोर्टात याचिका दाखल करण्यात आली होती. यावेळी हायकोर्टाने टेंडर रद्द करून सरकारच्या थोबाडीत दिली होती.कोर्टाच्या चपराकीनंतर आरोग्य मंत्र्यांनी घाईगडबडीत टेंडर पुन्हा काढले. 30 ऑगस्ट 2024 रोजी खरेदी समितीची बैठक घेतली. 3 नोव्हेंबर एलओआय दिला. यावेळी खरेदी समितीवर दबाव होता. हायकोर्टाने दणका दिल्यावरही केवळ घाईत नव्या प्रशासकीय मान्यतेचा फार्स करून नवीन टेंडर काढले. ही प्रशासकीय मान्यता उपलब्ध करून दिली नाही. हे गंभीर आहे. यामध्ये अटीत बदल करण्यात आले असून सर्वेची अट घातली आहे. या नव्या टेंडरवेळी एकूण 12 लोकांनी टेंडर भरले. मात्र यामध्ये विभागनिहाय सर्वे/जीओ टॅगिंग प्रमाणित करून मागितले. कारण मर्जीतील कंपन्यांना हे काम द्यायचे ठरले होते.यासाठी मंत्री कार्यालयातील अधिकाऱ्यांनी दबाव आणला होता. राज्यातील 8 आरोग्य उपसंचालकांना केवळ मर्जीतल्या कंपन्यांना काम देण्यासंदर्भात हा दबाव होता. हे टेंडर मॅनेज करण्यासाठी एका मंत्र्याच्या पुण्यातील चार्टर्ड अकाऊंटंटने प्रयत्न केले होते. याचा देखील तपास झाला पाहिजे. प्री बीडमध्ये एल वन ला केवळ चार सर्कल द्यायचे होते. परंतु यामध्ये संपूर्ण आठ सर्कल देण्यात आले. नागपूर हाय कोर्टात केस प्रलंबित असताना फायनान्सिअल बीड ओपन करणे चुकीचे होते. आर्थिक तरतूद नसताना केवळ मंत्र्यांच्या बैठकीचा दाखला देऊन ही प्रक्रीया करणे चुकीचे होते.

सुधारित प्रशासकीय मान्यता हा केवळ फार्स आहे. मर्जीतील कंपन्यांसाठी साईड सर्वे रिपोर्टची मागणी केली जाते. हे गंभीर आहे. ही निविदा बीएससी कॉर्पोरेशन लि. कंपनीला ही निविदा का देण्यात आली. या कंपनीला कामाचा काय अनुभव आहे. यांनी किती कामे केली हा संशोधनाचा विषय आहे. या टेंडर प्रक्रीयेत इतर कंपन्यांनी का भाग घेतला नाही. यामध्ये मंत्री कार्यालयातील अधिकारी, विभागातील अधिकारी किती सामिल आहेत. याची लाचलुचपत खात्यामार्फत चौकशी झाली पाहिजे, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली आहे.

# राष्ट्रकुट पर्यटक निवास, वेरूळ पर्यटकांच्या सेवेत दाखल- पर्यटनमंत्री गिरीश महाजन

■ मुंबई



जागतिक पर्यटन दिनाचे औचित्य साधुन महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे राष्ट्रकुट पर्यटक निवास, वेरुळ पर्यटकांच्या सेवेत दाखल होत आहे. आगामी काळात पर्यटन स्थळांच्या ठिकाणी पर्यटकांना तारांकित दर्जाच्या सोयी-सुविधा उपलब्ध करण्यावर पर्यटन विभागाचा भर असुन लवकरच विविध सुविधा निर्माण करण्यात येत आहेत, असे प्रतिपादन पर्यटनमंत्री गिरीश महाजन यांनी केले.

सह्याद्री अतिथीगृह येथे जागतिक पर्यटन दिन २७ सप्टेंबर रोजी आहे. या दिनाचे औचित्य साधुन महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या राष्ट्रकुट पर्यटक निवास, वेरुळचा पर्यटनमंत्री गिरीश महाजन यांनी दूरदृश्यप्रणालीव्दारे शुभारंभ केला. यावेळी पर्यटन विभागाच्या सचिव जयश्री भोज,महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मनोज सूर्यवंशी, पर्यटन संचालक डॉ.बी.एन.पाटील, एमटीडीसीचे महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल उपस्थित होते.

मंत्री महाजन म्हणाले की, युनेस्कोने इ.स. 1983 मध्ये वेरूळ लेणीचा समावेश जागतिक वारसास्थळांच्या यादीत केला आहे. लाखो पर्यटक येथे भेट देत असतात. याठिकाणी पर्यटकांसाठी राहण्याच्या सोयी मर्यादित असल्याने पर्यटकांमधून नाराजी व्यक्त होत होती. त्यामुळे महामंडळाने या ठिकाणी 4 हजार 13.23 चौमी एवढया जागेत अद्ययावत असे पर्यटक निवासाचे बांधकाम केले आहे. 20 खोल्या, 2 डॉरमेट्री, 1 उपहारगृह, 1 किचन, स्वागतकक्ष इत्यादी सोयी उपलब्ध आहेत. पर्यटक निवास बांधण्याकरिता 7 कोटी रुपये इतका निधी खर्च करण्यात आला आहे. सर्व खोल्या या वातानुकुलित असुन भव्य असे 2 लोकनिवास महीला आणि पुरुषांसाठी तयार करण्यात आले आहेत. भांडारकक्ष, स्वच्छतागृह, अपंगांसाठी स्वच्छतागृह, स्वागतकक्ष, व्यवस्थापक कक्ष याचाही यामध्ये समावेश आहे.

पर्यटन विभागाच्या सचिव जयश्री भोज म्हणाल्या की, राष्ट्रकुट पर्यटक निवासामुळे वेरुळ लेणी पाहण्यासाठी येणाऱ्या आणि घृष्णेश्वर दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची उत्तम दर्जाची सोय होणार आहे. येथे येणाऱ्या परदेशी पर्यटकांनाही लेण्यांच्या सानिध्यात राहण्याची संधी उपलब्ध होणार असून छत्रपती संभाजीनगर शहरापासुन वेरुळ जवळच असल्याने पर्यटक या ठिकाणी राहण्यास जास्त पसंती देतील.

व्यवस्थापकिय संचालक मनोजकुमार सूर्यवंशी म्हणाले की, पर्यटक निवासाच्या समोरच हेलीपॅड असून जवळच जागतिक दर्जाचे अभ्यागत केंद्रही आहे. पर्यटक निवासामध्ये विविध सोयी असल्याने पर्यटकांना राहण्याचा आनंद घेता येणार आहे. तसचे सदरचे पर्यटक निवास हे वेरुळ लेण्यांच्या अगदी समोरील बाजुस असल्याने पर्यटकांना निवासाच्या खोल्यांमधून आणि छतावरुन लेण्यांचे विहंगम दृश्य अनुभवता येणार आहे. राष्ट्रकूट पर्यटक निवासाचे व्यवस्थापन महामंडळाचे महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल आणि प्रादेशिक व्यवस्थापक दीपक हरणे हे करीत आहेत.

# मला मुख्यमंत्री व्हायचे आहे, पण वारंवार उपमुख्यमंत्रीपदावर अडकतो- अजित पवार

■ मुंबई

अनेकदा राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी राज्याचा मुख्यमंत्री होण्याबाबतच आपली इच्छा अनेकदा बोलून दाखवली आहे. अशातच अजित पवार यांनी पुन्हा एकदा एका कार्यक्रमामध्ये बोलताना त्यांनी मुख्यमंत्री पदाबाबतची इच्छा बोलून दाखवत असताना मोठं वक्तव्य केलं आहे. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी मुख्यमंत्री होण्याची इच्छा उघडपणे बोलून दाखवली. एका कार्यक्रमादरम्यान त्यांनी सांगितले की, मला मुख्यमंत्री व्हायचे आहे, पण वारंवार उपमुख्यमंत्रीपदावर अडकतो. यावेळी त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील महायुती म्हणजेच राष्ट्रवादी काँग्रेस, भारतीय जनता



पक्ष आणि शिवसेना यांच्यातील जागावाटपावरही भाष्य केलं आहे.

इंडिया टुडेच्या एका कार्यक्रमात अजित पवार म्हणाले, 'मला मुख्यमंत्री व्हायचे आहे, पण मी पुढेच जात नाही. मला संधी मिळत नाहीये. 2004 मध्ये राष्ट्रवादीला मुख्यमंत्री करण्याची संधी होती, पण पक्षाने ती गमावली, असेही ते म्हणाले. विशेष म्हणजे 2004 मध्ये महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद काँग्रेसच्या खात्यात आले.

2004 च्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस महाराष्ट्रातील सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला. त्यावेळी पक्षाला 71 जागा मिळाल्या होत्या. तर काँग्रेस 69 जागांवर विजय मिळवत दुसऱ्या क्रमांकावर आहे. त्यानंतर काँग्रेस नेते विलासराव देशमुख मुख्यमंत्री झाले. देशमुख यांचे2012 मध्ये निधन झाले.

2019 मध्ये पक्षाने जिंकलेल्या जागांच्या आधारे जागावाटप केले जाईल, असे अजित यांनी कार्यक्रमात बोलताना सांगितले. ते म्हणाले, 'भाजप 2019 मध्ये जिंकलेल्या जागांवर निवडणूक लढवेल. राष्ट्रवादी आणि शिवैसेनेचेही तेच होईल. अशा स्थितीत 200 जागांवर जागावाटपाचा फॉर्म्युला स्पष्ट झाला आहे. उर्वरित 88 जागांवर महायुतीत चर्चा केली जाईल.

## सोन्याची बनावट बिस्किटे देऊन फसवणूक

■ मुंबई

सोशल मीडियाच्या माध्यमातून कमी किमतीत सोन्याची बिस्किटे मिळवण्याची दिशाभूल करणारी जाहिरात करून फसवणूक केल्याची घटना समोर आली आहे. दहिसर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अभिषेक मिश्रा सोशल फेसबुकवर काहीतरी शोधत होता. यावेळी त्यांनी रमेशवर बनावट पटेलचे प्रोफाईल पाहिले असता रमेश हा स्वत:ला ज्वेलर्स सांगून कमी किमतीत सोन्याची बिस्किटे मिळवून देतो. अभिषेकला लोभ आला आणि रमेश यांच्याशी संपर्क साधला. रमेश 100 ग्रॅम वजनाची सोन्याची बिस्किटे कमी किंमतीत म्हणजेच 52 हजार रुपयांना विकत असल्याचे समोर आले होते. अभिषेकने रमेशसोबत डील फायनल केली. त्याने दहिसरला पाठवलेल्या व्यक्तीने राहुलने 52 हजार रुपये घेऊन अभिषेकला बिस्किटे दिली.

# महायुतीच्या विजयासाठी भाजप सज्ज

## प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती



■ मुंबई

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आपल्या दोन दिवसाच्या महाराष्ट्र दौऱ्यात पदाधिकाऱ्यांना, कार्यकर्त्यांना केलेल्या मार्गदर्शनामुळे संघटनेत ऊर्जा निर्माण झाली असून आगामी निवडणुकीत महायुतीच्या विजयासाठी पक्ष संघटना सज्ज झाली आहे, अशी माहिती भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी गुरुवारी येथे दिली. आगामी विधानसभा निवडणुका लक्षात घेऊन भाजपचे कार्यकर्ते घरोघरी जाऊन सामान्य जनतेच्या मनात महाविकास आघाडीने खोट्या प्रचारामुळे निर्माण केलेला संभ्रम दूर करतील. त्याचबरोबर केंद्र आणि राज्य सरकारच्या कामगिरीची माहिती देतील, असेही बावनकुळे यांनी सांगितले.

अमित शाह यांनी २५ आणि २५ सप्टेंबर अशा दोन दिवसात विदर्भ, मराठवाडा, पश्चिम आणि उत्तर महाराष्ट्रात संघटनात्मक बैठका घेतल्या. या बैठकीच्या पार्श्वभूमीवर आज प्रदेश कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना बावनकुळे म्हणाले, या दौऱ्यामध्ये जवळपास पाच हजार पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांशी शाह यांनी संवाद साधला. आगामी विधानसभा निवडणुकीत महायुतीमध्ये समन्वय असावा. महायुतीचा विजय व्हावा यासाठी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी कसे काम करावे याविषयी शाह यांनी मार्गदर्शन केले.

बूथपातळीवरच्या महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांच्या मनात केंद्र आणि राज्य सरकार विषयी असलेले गैरसमज दूर करण्यासाठी भाजप कार्यकर्त्यांनी प्रयत्न करण्याची सूचना शाह यांनी केली आहे. त्यादृष्टीने पक्ष कार्यकर्ते बूथपातळीवर सक्रीय होतील. पक्ष कार्यकर्त्यांनी बूथपातळीपर्यंत सामान्य जनतेशी संपर्क साधावा तसेच केंद्र आणि राज्य सरकारच्या लाभार्थ्यांचा सन्मान करणे, सरकारची चांगली कामगिरी आणि संघटनेची ताकद याच्या जोरावर राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार आणणे, यासाठी अमित शाह यांनी या संघटनात्मक बैठकांमध्ये कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांना विजयाचा मंत्र दिल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

अमित शाह यांनी प्रमुख पदाधिकाऱ्यांना केलेल्या मागदर्शनामुळे संघटनेत उर्जा निर्माण झाली आहे. शाह यांनी संघटन शक्ती मजबूत करण्याच्या आणि डबल इंजिन सरकारची कामगिरी सामान्य माणसांपर्यंत पोहचवण्याचा दिलेल्या मूलमंत्राचे आम्ही पालन करू आणि राज्यात पुन्हा महायुतीचे सरकार आणण्यासाठी प्रयत्न करू, असेही चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

# बदलापूर प्रकरणात पोलिसांविरोधातील याचिकेवर शिवसेनेचा आक्षेप!

## वकील असीम सरोदे उद्धव ठाकरेंचे निकटवर्तीय- डॉ. मनीषा कायंदे यांचा आरोप

■ मुंबई

बदलापूरसारख्या संवेदनशील प्रकरणात वकील असीम सरोदे यांनी पोलिसांविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेल्या याचिकेवर शिवसेनेच्या सचिव तथा प्रवक्त्या मनिषा कायंदे यांनी आक्षेप घेतला. वकील सरोदे शिवसेना (ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंचे ते निकटवर्तीय असल्याचा आरोप त्यांनी केला. दरम्यान, ते राजकीय अजेंडा राबवत आहेत का, अशी शंका ही उपस्थित केली. बाळासाहेब भवन येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. बदलापूर प्रकरणानंतर विरोधकांनी आरोपीला ताबडतोब फाशी द्या, अशी मागणी केली होती. याबाबत खटला सुरु होता. मात्र रिमांडमध्ये असताना आरोपीने पोलिसांवर गोळीबार केला आणि स्वसंरक्षणासाठी पोलिसांनी केलेल्या गोळीबारात त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी पोलिसांच्या भूमिकेवर संशय व्यक्त करत वकील सरोदे यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. कोर्टात जाण्याचा प्रत्येकाला अधिकार आहे. मात्र, सरोदे आणि ठाकरेंचे धनिष्ठ संबंध आहेत. अनेकदा सोशल माध्यमातून त्यांचे फोटो समोर आले आहेत. त्यामुळे यांची भूमिका संशयास्पद असल्याचे दिसून येते, असा आरोप कायंदे यांनी केला. कोविड काळात मुंबईत कोविड सेंटर घोटाळा, बॉडीबॅग घोटाळा, खिचडी घोटाळा असे कोट्यवधी रुपयांचे घोटाळे झाले. महाविकास आघाडीच्या काळात मनसुख हिरेन यांची हत्या झाली होती, त्याविषयी सरोदेंनी न्यायालयात धाव का घेतली नाही, असा सवाल त्यांनी केला. लोकसभा निवडणुकीच्या काळात निर्भय बनो आंदोलन आणि पंतप्रधान नरेंद्र मोदींवर केलेल्या आरोपांचा कायंदे यांनी दाखला यांनी सरोदेंवर जोरदार टीका केली.



अक्षय शिंदेच्या मृतदेहाचं शवविच्छेदन झाल्यानंतर त्याचा मृतदेह दफन करण्याचा निर्णय कुटुंबीयांनी घेतला. मात्र, अक्षय शिंदेचा मृतदेहावर अंत्यसंस्कार करण्यासाठी जागा देण्यास स्थानिकांचा विरोध आहे. याबाबत आज झालेल्या सुनावणीत मुंबई उच्च न्यायालयानं राज्य सरकारला जागा उपलब्ध करून देण्याचा आदेश दिलाय. मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे व न्यायमूर्ती एम. एम. साठ्ये यांच्या खंडपीठासमोर याप्रकरणी सुनावणी झाली.

बदलापूर प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेला दफन करण्यासाठी जागा शोधण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयानं सरकारला दिला होता. मात्र, या जागेबाबत जाहीर माहिती न देता जागा निश्चित झाल्यावर अक्षयच्या कुटुंबियांना त्याची माहिती देण्यात यावी, असं न्यायालयानं म्हटलं होते. सोमवारपर्यंत त्याच्यावर अंत्यसंस्कार करण्यात यावे, असंही न्यायालयानं स्पष्ट केले होते .

# संजय राऊत यांनी राजीनामा द्यावा!

## भाजपा नेते आ.ॲड आशिष शेलार यांची मागणी

■ मुंबई

शिवसेना उध्दव ठाकरे शिवसेनेचे नेते, युवा सेना प्रमुख आ.आदित्य ठाकरे आणि त्यांच्या पक्षाने मागील २५ वर्षात जी निकृष्ट दर्जाची कामे केली त्यामुळेच मुंबईकरांना हे भोगावे लागत असून बुधवारी जी परिस्थिती निर्माण झाली त्याला तेच जबाबदार आहेत, असा आरोप करतानाच मुंबई भाजपा अध्यक्ष आ. ॲड.आशिष शेलार यांनी गुरूवारी येथे प्रदेश कार्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत बोलताना केला.त्याचवेळी त्यांनी ठाकरे सेनेचे नेते खा.संजय राऊत यांनी राजीनामा द्यावा अशी मागणीही यावेळी केली.

यावेळी त्यांनी युवा सेना नेते आ. आदित्य ठाकरे यांनी केलेल्या टीकेलाही चोख प्रत्युत्तर दिले.खा.संजय राऊत यांनी एका महिलेची बदनामी केल्याप्रकरणी न्यायालयाने त्यांना दोषी ठरवलेले असल्याने महिलेची बदनामी करणाऱ्या या व्यक्तीला रश्मी ठाकरे यांनी सामनाच्या कार्यकारी संपादक पदी ठेवू नये. इतकेच नव्हे तर त्यांनाही राज्यसभेच्या सदस्यपदी राहण्याचा अधिकारच नसून त्यांनी राजीनामा दिला पाहिजे, अशी मागणीही आ. शेलार यांनी केली.

उध्दव ठाकरे यांच्या शिवसेनेने गेल्या पंचवीस वर्षात मुंबई महापालिकेत सत्तेत असताना जी कामे केली ती निकृष्टच दर्जाची आहेत. त्यांनी जाहीर केलेला ब्रिमस्टोवॅड प्रकल्प वेळेत पुर्ण होवू न शकल्याने महानगर पालिकेचे हजारो कोटी रुपये खर्च करुन पाण्याचा निचरा करणारी यत्रणा ते उभी करु शकले नाहीत.गेल्या एक दोन वर्षांच्या कामावर कालची परिस्थिती उद्भवली नाही तर गेल्या पंचवीस वर्षांतील निकृष्ट दर्जाचीच कामे त्याला जबाबदार आहेत, असा थेट गंभीर आरोप करत जगविख्यात डॉ.अमरापूकर यांचा जो गटारात पडून मृत्यू झाला त्याचे आधी पापक्षालन करा,असा खोचक सल्लाही त्यांनी दिला.

# बिल्डर आणि म्हाडाचे अधिकारी यांची मिलीभगत खपवून घेतली जाणार नाही : हायकोर्ट

■ मुंबई

बिल्डरच्या सांगण्यावरून महिला आणि तिच्या कुटुंबीयांना जबरदस्तीने घरातून बाहेर काढण्याच्या घटनेवर मुंबई उच्च न्यायालयाने कडक भूमिका घेतली आहे. बिल्डर-डेव्हलपर आणि म्हाडाचे अधिकारी यांच्यातील संगनमत खपवून घेता येणार नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे. 14 डिसेंबर 2023 रोजी, महिलेला लोअर परळ भागातील पिरामल कंपाऊंड येथील ट्रान्झिट निवासस्थानातून बाहेर काढण्यात आले. महिलेच्या म्हणण्यानुसार, म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी तिला बेकायदेशीरपणे घरातून बाहेर काढले होते. या मनमानी कारवाईविरोधात महिलेने न्यायालयात याचिका दाखल केली आहे. अंतरिम दिलासा म्हणून, न्यायालयाने महिलेला माझगाव परिसरात ट्रान्झिट हाऊस उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत, तसेच एनएम जोशी मार्ग पोलिस स्टेशनला बेदखल घटनेबाबत एफआयआर नोंदवण्यास सांगितले आहे. तसेच पुढील सुनावणीदरम्यान तपासाचा प्रगती अहवाल बंद लिफाफ्यात मागवण्यात आला आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी 21 ऑक्टोबर रोजी होणार आहे.

न्यायमूर्ती एमएस सोनक आणि न्यायमूर्ती कमल खता यांच्या खंडपीठाने सांगितले की, बिल्डर-डेव्हलपरच्या सांगण्यावरून म्हाडा आणि पोलिस अधिकाऱ्यांनी कायदा हातात घेतला आहे. योग्य कायदेशीर प्रक्रिया न पाळता तिघांनी महिलेला घरातून हाकलून दिले. लोअर परळमधील घर दुसऱ्याला दिलेले असल्याने म्हाडाच्या सूचनेनुसार या महिलेला माझगाव येथील ट्रान्झिट घर देण्याचे आदेश खंडपीठाने दिले. बिल्डरला महिलेच्या घराचे एक वर्षाचे भाडे म्हाडाकडे जमा करण्यास सांगितले आहे.

## संपादकीय


# प्रदूषणावर उपाय फक्त देखावा, अर्धवट नियोजन

मान्सूनची परतवाट होऊन गेल्यावर भारताच्या जवळपास अर्ध्या भागात हवेचा मिजाज बदलण्यास सुरुवात होते आणि उत्तर-पश्चिम दिशेकडून येणाऱ्या वाऱ्यांमुळे काहीच दिवसांत थोडीशी थंडी जाणवू लागते. थंडीमुळे हवेतील प्रदूषण करणारे कण वाढतात कारण ते जमिनीपासून जास्त उंच जाऊ शकत नाहीत. यामुळे प्रदूषण वाढते. या प्रदूषणाच्या कणांमध्ये वाहनांचे उत्सर्जन, लाकूड, गोवऱ्या किंवा कोळसा जाळल्याने निर्माण होणारा धूर आणि धूळ तर असतेच, शिवाय पराली (शेतातील पिकांच्या शिल्लक अवशेषांचे) जाळल्याने होणारा धूर देखील असतो. गेल्या काही दिवसांपासून पंजाबमधून पराली जळण्याच्या बातम्या येत आहेत. गेल्या जवळपास एक दशकापासून उत्तर भारतात, विशेषत: दिल्ली-एनसीआरमध्ये, हवेचे प्रदूषण वाढल्यास सरकार, सर्वोच्च न्यायालय आणि विविध प्रदूषणविरोधी यंत्रणा सक्रिय होतात. दिल्ली-एनसीआरमध्ये सर्वात आधी प्रदूषण वाढते, त्यामुळे दिल्ली सरकारच्या प्रदूषणविरोधी कारवायाही सुरू होतात. दिल्ली सरकारने प्रदूषण नियंत्रित करण्यासाठी ग्रेप (GRAP) प्रणाली लागू केली आहे. याअंतर्गत दिल्ली-एनसीआरमधील हवेची गुणवत्ता कमी झाली की, म्हणजेच AQI वाढला की, वेगवेगळ्या टप्प्यांत विविध उपाययोजना लागू केल्या जातात. यात बांधकाम आणि औद्योगिक कार्यांवर बंदी, ऑड-इव्हन सिस्टम, तसेच इतर राज्यांतील डिझेल वाहनांच्या प्रवेशावर बंदी यांचा समावेश होतो. परंतु, आतापर्यंतचा अनुभव सांगतो की हे उपाय फारसे प्रभावी ठरत नाहीत. पंजाब, हरियाणा इत्यादी राज्यांमध्ये पराली जाळण्यास प्रतिबंध करणारे उपाय अजूनही प्रभावी नाहीत. पंजाबमध्ये पराली जाळल्याच्या बातम्यांमधून हे स्पष्ट होते की पराली जाळणे थांबवण्यासाठी जे उपाययोजना केल्या जात आहेत, त्या अर्धवटच आहेत. कोठे किती पराली जाळली गेली याची आकडेवारी समोर येते, पण पराली जाळणे केव्हा थांबेल हे कोणालाच माहीत नाही. कदाचित याच कारणामुळे गेल्या काही दिवसांपूर्वी सर्वोच्च न्यायालयाने असे म्हटले की, पराली जाळण्यास प्रतिबंध करणारे उपाय फक्त कागदावरच आहेत. म्हणूनच या वर्षीदेखील पंजाब आणि इतर राज्यांमध्ये पराली जाळणे थांबेल असे दिसत नाही. हवेच्या प्रदूषणावर नियंत्रण आणण्यासाठी सरकारने जे कठोर पावले उचलायला हवीत, ती उचलली जात नाहीत, कारण त्यावर राजकीय आरोप-प्रत्यारोप होतात आणि प्रशासन देखील योग्य वेळी निर्णय घेण्याऐवजी टाळाटाळ करते. दिल्ली-एनसीआरसह देशातील इतर मोठ्या शहरांमध्ये रस्त्यांवर बेकायदेशीर अतिक्रमण आणि त्यामुळे होणारी वाहतूक कोंडी हे सामान्य झाले आहे. याशिवाय रहिवासी भागांमध्ये चालणाऱ्या औद्योगिक क्रियाकलापांचाही यात सहभाग आहे. औद्योगिक क्षेत्रांचा योग्य प्रकारे विकास करण्यात आलेला नाही, त्यामुळे अशी स्थिती निर्माण झाली आहे. या बाबतीतही, बांधकामाच्या ठिकाणी धूळ नियंत्रित करावी याकडे कोणी लक्ष देत नाही. सरकार इच्छाशक्ती दाखवेल तर बांधकामाच्या ठिकाणी आणि रस्त्यांवरून उडणारी धूळ नियंत्रित करू शकते, पण त्यासाठी कोणतेही ठोस पावले उचलली जात नाहीत. प्रदूषणावर नियंत्रण आणण्यासाठी जी राजकीय इच्छाशक्ती लागते, तिचा अभाव आहे आणि याचमुळे हवेचे प्रदूषण वाढवणाऱ्या कारणांवर उपाय होत नाही. आपल्या देशात हवेच्या प्रदूषणाबाबत जेवढी जागरूकता असायला हवी, तेवढी नाही. यामुळे समाजाचा केवळ एक छोटा वर्गच प्रदूषणाबद्दल चिंता व्यक्त करतो. पर्यावरणतज्ज्ञ, शहरी उच्चवर्गीय आणि इतर काही लोकच वायुप्रदूषणामुळे चिंतित असतात. त्यामुळे नेत्यांना त्याची फारशी काळजी वाटत नाही आणि प्रशासनालाही त्याची जाणीव नसते. ही परिस्थिती तेव्हा आहे, जेव्हा एकामागून एक अभ्यास अहवाल हे दर्शवतात की, वायुप्रदूषण माणसाच्या आरोग्यासाठी गंभीर धोका निर्माण करत आहे. सरकारने हे लक्षात घेतले पाहिजे की वायुप्रदूषणावर नियंत्रण आणण्यासाठी फक्त कडक बंदी घातल्याने प्रदूषणाच्या मूळ कारणांवर उपाय होणार नाही. प्रदूषण ही फक्त काही दिवसांची समस्या नाही. हे वर्षभर चालणारे संकट आहे. प्रदूषण कधी कमी, तर कधी जास्त होते, पण ते पूर्णपणे संपत नाही. त्यामुळे दीर्घकालीन धोरण अवलंबूनच या समस्येचे निराकरण होऊ शकते. प्रदूषणावर नियंत्रण आणण्याची चिंता कायम केली पाहिजे. वर्षातले काही महिने प्रदूषणाबद्दल काळजी घेऊन काहीही साध्य होणार नाही. वायुप्रदूषण कोणत्याही एका राज्याची समस्या नाही, त्यामुळे सर्व राज्य सरकारांनी एकत्र येऊन त्यावर उपाययोजना केली पाहिजे.

# एक देश एक निवडणूक: जितके मोहक तितकेच कठीण

माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या "एक देश, एक निवडणूक" या विषयावरील उच्चाधिकार समितीच्या अहवालास मान्यता दिल्यानंतर, या मुद्द्यावर संवैधानिक प्रक्रियांची सुरुवात होईल आणि व्यापक राष्ट्रीय चर्चा सुरू होईल.

कोविंद समितीच्या शिफारशींनुसार, "एक देश, एक निवडणूक" हे क्रांतिकारी उद्दिष्ट दोन टप्प्यांत लागू करण्याचा प्रस्ताव आहे. पहिल्या टप्प्यात लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकत्र घेणे आणि दुसऱ्या टप्प्यात सर्वसाधारण निवडणुका झाल्यानंतर 100 दिवसांच्या आत स्थानिक स्वराज्य संस्थांची (पंचायत आणि नगरपालिका) निवडणूक घेणे अपेक्षित आहे. शिफारशींनुसार, सर्व निवडणुकांसाठी समान मतदार यादी तयार होईल आणि राष्ट्रव्यापी चर्चेनंतर एक कार्यान्वयन गट गठीत केला जाईल.



### अडचणींवर मात करण्यासाठी आव्हाने कमी नाहीत

नगरपालिकांपासून संसदपर्यंतच्या निवडणुका एकत्र घेण्याची प्रक्रिया सोपी करण्यासाठीच या संपूर्ण संवैधानिक आणि राजकीय प्रक्रियेला दोन भागांमध्ये विभागले गेले आहे. आता बघायचं आहे की मोदी सरकारचं हे महत्वाकांक्षी स्वप्न कसं पूर्ण होतं, कारण "एक देश, एक निवडणूक" हे जितकं आकर्षक वाटतं तितकं ते साधं नाही.

या साठी महत्त्वपूर्ण संविधानिक बदलांची गरज भासेल तसेच राष्ट्रीय सहमतीचीही महती आवश्यकता आहे. त्यातच विरोधक, विशेषतः काँग्रेस पक्ष, यास समर्थन देण्याची शक्यता काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी पूर्णतः नाकारली आहे. सध्याच्या स्थितीत सत्ताधारी पक्ष आणि विरोधी पक्ष यांच्यात तणावाची स्थिती आहे.

### भाजपासाठी आव्हाने कमी नाहीत

भाजपा स्वतःच्या बळावर नव्हे तर सहयोगी पक्षांच्या पाठिंब्याने सत्तेत आहे. अलीकडेच मोदी सरकारला काही निर्णयांमुळे बॅकफुटवर यावं लागलं आणि यामुळे एकत्र निवडणुकांच्या महत्वाकांक्षी योजनेवर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविकच आहे.

असे असले तरी, आशावादी विचारक आणि भाजपाचे समर्थक मानतात की मोदी सरकारने गेल्या कार्यकाळात कलम 370 रद्द करून जसे कठीण कार्य केले तसेच हे कार्य देखील करू शकेल. मोदी सरकारला आपली ताकद सिद्ध करण्यासाठी हे जटिल कार्य पार पाडावे लागणार आहे.

### संवैधानिक बदल आणि कायदेशीर सुधारणा आवश्यक

भारतीय संविधानात राष्ट्रीय आणि राज्य पातळीवर एकत्रित निवडणुकांचे कोणतेही प्रावधान नाही. हे संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी संविधानिक दुरुस्ती, राजकीय सहमती आणि एक विस्तृत प्रक्रिया आवश्यक आहे. राज्य विधानसभांच्या आणि लोकसभेच्या निवडणुकांचे कालावधी एकाच वेळी संपत नाहीत. त्यामुळे या कालावधींमध्ये समन्वय साधण्यासाठी दोन्ही स्तरांवर संविधानिक आणि कायदेशीर सुधारणा करण्याची गरज आहे. संविधान तज्ज्ञांच्या मते, यासाठी किमान 5 संविधानिक कलमांमध्ये बदल करावा लागेल.

### संवैधानिक अडचणी

संविधानाच्या अनुच्छेद 83 खंड (2) नुसार, लोकसभेचा कार्यकाळ पाच वर्षे निश्चित केलेला आहे. संविधानाच्या अनुच्छेद 85 मध्ये संसदेच्या सत्रांसंबंधी नियम दिले आहेत. राज्य विधानसभेच्या कार्यकाळाचे नियमन अनुच्छेद 172 मध्ये करण्यात आले आहे.

या अनुच्छेदानुसार, विधानसभेचा सामान्य कार्यकाळ पाच वर्षांचा आहे. पण काही विशेष परिस्थितीत राज्यपाल विधानसभेचे विघटन करू शकतो, जसे की बहुमताचा विश्वासघात झाल्यास किंवा राज्यपाल याची शिफारस केल्यास. संविधान आपत्कालीन परिस्थितीत विधानसभा कालावधी वाढवण्याची परवानगी देखील देते.

राज्य सरकारची संवैधानिक यंत्रणा खंडित झाल्यास, केंद्र सरकार अनुच्छेद 356 अंतर्गत प्रदत्त अधिकारांचा वापर करून राज्य सरकारच्या कारभाराचा ताबा घेऊ शकते. यालाच "राष्ट्रपती राजवट" असेही म्हणतात. परंतु सध्याच्या काळात या अनुच्छेदाचा वापर सोपा राहिलेला नाही. केंद्रशासित प्रदेशांच्या विशेष स्थितीसाठी योग्य सुधारणा करावी लागतील.

अनुच्छेद 324 मध्ये बदल करून निवडणूक आयोगाला एकत्रित निवडणुकीसाठी अधिक अधिकार आणि जबाबदारी देऊन सशक्त करणे आवश्यक आहे, ज्यामुळे आयोग राज्य सरकारच्या संमतीशिवाय निवडणूक तारीखा ठरवू शकेल.

### व्यवहारिक अडचणी

स्वातंत्र्यानंतर, पहिली निवडणूक, 1957, 1962, आणि 1967 मध्ये लोकसभा आणि विधानसभा निवडणुका एकत्र घेतल्या होत्या. परंतु दलबदल, राजकीय अस्थिरता आणि अनुच्छेद 356 चा वारंवार वापर झाल्यामुळे एकत्र निवडणुकीची प्रथा बंद झाली.

अविश्वास प्रस्तावाद्वारे राज्य सरकारे वेळेपूर्वी कोसळली आणि खंडित जनादेशामुळे विधानसभा नवीन बहुमताची सरकार निवडण्यात अपयशी ठरली. त्यामुळे अविश्वास प्रस्ताव आणि विधानसभांच्या विघटनाशी संबंधित नियमांमध्येही बदल आवश्यक ठरतील.

निवडणुका एकत्र घेण्यासाठी दहाव्या अनुसूचीमध्ये (दलबदल विरोधी कायदा) देखील सुधारणा आवश्यक आहे. संविधानिक बदलांसाठी लोकसभा आणि राज्यसभेत दोन-तृतीयांश बहुमत आणि किमान निम्म्या राज्यांच्या विधानमंडळांचा पाठिंबा आवश्यक असतो. अशी सर्वसमावेशक सहमती मिळवणे आणि संविधानात यशस्वीपणे सुधारणा करणे हे दीर्घ आणि आव्हानात्मक कार्य आहे.

### विरोधकांची सहमती मिळवणे सोपे नाही

जेव्हा निवडणूक आयोग महाराष्ट्र आणि हरियाणाच्या निवडणुका एकत्रित करू शकत नाही किंवा पश्चिम बंगालमध्ये सात टप्प्यांत निवडणुका होतात, तेव्हा देशभरात एकत्र निवडणुका कशा होऊ शकतात, असा प्रश्न विचारला जातो. एकत्र निवडणुकांच्या समर्थनार्थ खर्च वाचवण्याचा मुद्दा मांडला जातो, परंतु भारतासारख्या विशाल आणि मोठ्या लोकसंख्येच्या देशात निवडणुका घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात संसाधनांची आवश्यकता असते.

एकत्रित निवडणुका घेण्यामुळे निवडणूक आयोग, सुरक्षा दल आणि प्रशासकीय यंत्रणेवर मोठा ताण येईल. देशाच्या प्रत्येक कोपऱ्यात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे, प्रशिक्षित कर्मचारी आणि पुरेसे पायाभूत सुविधा उपलब्ध करणे हे अवघड काम ठरेल. या नवीन व्यवस्थेमुळे राष्ट्रीय मुद्द्यांवर लक्ष केंद्रीत होईल, तर प्रादेशिक चिंतांचा अपलाप होऊ शकतो, ज्यामुळे संघराज्य व्यवस्था कमकुवत होऊ शकते.

राष्ट्रीय आणि राज्य पातळीवरील विविध राजकीय पक्षांमध्ये एकत्रित निवडणुका घेण्यावर सहमती मिळवणे हे मोठे आव्हान आहे. विपक्षी पक्ष या विचाराला विरोध करताना दिसत आहेत. स्वतंत्र भारतातील पहिल्या निवडणुकीत म्हणजे 1951-52 मध्ये देशाच्या निवडणूक आयोगाकडे पुरेशी साधने नव्हती तरीही ग्रामपातळीपासून संसदपर्यंत निवडणुका घेण्यात आल्या होत्या. त्यावेळी राज्यसभा आणि राज्यांच्या विधानपरिषदा निवडणुका देखील एकत्रित घेतल्या होत्या.

त्या काळात तीन प्रकारचे राज्य होते. संचार साधने कमी होती. रस्ते नव्हते. टेलिफोन सुविधा नसल्यामुळे दूरवरच्या भागात वायरलेसची व्यवस्था करण्यात आली होती. निवडणूक आयोगाचे प्रमुख सुकुमार सेन यांच्या नेतृत्वाखाली हे झाले. आज परिस्थिती भिन्न आहे. संसाधनांची कमतरता नाही, मात्र राजकीय सहमतीची कमतरता आहे.

# संघीशिवाय विजय नाही

भारतीय जनता पक्षाला सध्या अध्यक्ष नाहीत. संघाची गरज नाही, असे म्हणणारे नड्डा हेच सध्या अध्यक्षपदाचा भार कसाबसा उचलून गतिहीन अवस्थेत आपले अध्यक्षपद सोडण्यासाठी उतावीळ झालेले आहेत. नड्डा यांनी इंडियन एक्सप्रेसला मुलाखत देताना भारतीय जनता पक्षाला आता राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची गरज नाही, असे ठणकावून बजावले होते. हे वाक्य जरी नड्डा यांच्या तोंडून निघाले असले. तरी त्याचे बोलविते धनी मोदीजीच असावेत यात शंका घेण्याचे कारण नाही. चार राज्यांच्या निवडणुका एकत्रित घेण्याची हिंमत न दाखवल्यामुळे भारतीय जनता पक्षाच्या पक्षश्रेष्ठींची सध्या मोठी पंचाईत होत आहे. जम्मू काश्मीर आणि हरियाणा या दोन्ही राज्यात कोणे एकेकाळी भाजपची सत्ता होती. आता न्यायालयाने तंबी दिल्यावर जम्मू-काश्मीरची निवडणूक जाहीर करण्यात आली. हरियाणाची निवडणूक अपेक्षितच होती. ती सुद्धा जाहीर करण्यात आली. पण या दोन्ही राज्याच्या प्रचारापासून मोदीजी आणि शहा जवळ जवळ अलिप्त आहेत. नावाला काही सभा घेतल्या. पण त्या सभांमध्ये जीवच नाही अशी एकूण परिस्थिती आहे. हरियाणा आणि जम्मू काश्मीर आपल्या हातातून गेले आहे. याची कल्पना मोदी आणि शहांना नक्कीच आहे. ही दोन राज्य गेली तरी चालतील. पण महाराष्ट्र आपल्या हाती असायलाच पाहिजे. असे भारतीय जनता पक्षाच्या पक्षश्रेष्ठींना वाटते. सेनापती बापट यांनी म्हटल्याप्रमाणे महाराष्ट्र गेला तरी राष्ट्र गेले, महाराष्ट्राविना राष्ट्रगाडा न चाले खरा वीर वैरी पराधीनतेचा, महाराष्ट्र आधार या भारताचा तेव्हा येनकेन प्रकारेण हा आधार आपल्या हाती राहावा, म्हणून महाराष्ट्राची निवडणूक थोडी लांबणीवर टाकण्यात आली. दरम्यानच्या काळात महाराष्ट्र जिंकण्यासाठी काय काय करता येईल, यासाठी अनेक योजना जाहीर करण्यात आल्या. त्याचा फायदा नक्कीच होईल. लाडक्या बहीणी नक्कीच मते देतील. इतरही अनेक लाडके आपल्यावर प्रसन्न होतील. असे भविष्य वर्तविण्यात आले होते. मात्र या सर्व घटनाक्रमात देशाच्या मध्यवर्ती स्थानावर असलेले नागपूर मध्यवर्ती स्थानावरच होते. नागपूर संघाच्या मुख्यालयाचे शहर आहे. नागपुरातील संघ कार्यालयातून जे जे आदेश गेले, ते ते संघाच्या स्वयंसेवकांनी शिरोधार्य मानले. गेली दहा वर्षे संघाला गृहीत धरून देशाचे राजकारण चालले होते. आता संघाची गरज नाही म्हटल्यावर संघाने त्याचे अक्षरशा पालन केले आणि भारतीय जनता पक्षाला दिवसा तारे दाखवून दिले. आता कसेही करून संघाला पटवणे किती गरजेचे आहे. हे दिसून आल्यामुळे परवा सरदार वल्लभभाई पटेल यांच्या खुर्चीवर बसलेले, गृहमंत्री अमित शहा नागपुरात दाखल झाले. राज्याच्या पदाधिकाऱ्यांची त्यांनी भेट घेतली. त्या बैठकीत प्रत्येकाला मोठी जबाबदारी देण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. परंतु या बैठकीसाठी या शहरातील सध्याचे खासदार केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी यांना बोलावले नाही किंवा ते बोलावूनही गेले नाहीत. एवढे मात्र खरे आहे. आता संघातर्फे भारतीय जनता पक्षाच्या अध्यक्षपदासाठी 12 वर्षे राजकीय वनवासात असलेल्या संजय जोशी यांना उमेदवारी द्यावी, असा आग्रह धरण्यात आला. संजय जोशी आणि मोदीजी यांचे विळ्या-भोपळ्याचे सख्ख्य आहे. ते संपूर्ण भारतीय जनता पक्षाला ठाऊक आहे. त्यामुळे अमित शहा यांनी सर्व कार्यक्रम सोडून नागपूर गाठले. पण या दौऱ्यात त्यांनी बराच आग्रह धरूनही सरसंघचालक भागवत त्यांना भेटले नाहीत. तरीही शहा यांनी रागारागात एक बैठक घेतली. त्यात गडकरी यांचा सहभाग नव्हता. या बैठकीत चाणक्य अमित शहा यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना चांगलेच झापले आणि कोणत्याही परिस्थितीत विदर्भातून 45 जागा मिळाल्याच पाहिजेत. असा चक्क आदेशच दिला. विदर्भात सुगीच्या दिवसातही भाजपला इतक्या जागा मिळाल्या नाहीत. मग आता एवढी मोठी जबाबदारी कोण सांभाळणार, हा सुद्धा प्रश्नच होता. अशा सर्व वातावरणात नड्डांचे नसणे आणि मोदींचे चिंतातूर होऊन बसणे हा कार्यकर्त्यांच्या दृष्टीने वेगळाच खेळ होता असे दिसले. खरा मुद्दा होता तो भाजपच्या अध्यक्षपदाचा, इथे संजय जोशी यांचे नाव पुढे आल्यावर भाजप श्रेष्ठींनी शिवराज सिंग चौहान यांचे नाव पुढे केले. पण शिवराज सिंग कधीही मोदी आणि शहा यांना विरोध करू शकणार नाहीत, असे दिसून आल्यामुळे संघाने त्या नावाला चक्क केराची टोपली दाखवली. त्यानंतर तिसरे नाव समोर आले ते वसुंधरा राजे यांचे संजय जोशी नको, शिवराज सिंग चौहान नको मग वसुंधरा राजे यांचा तरी स्वीकार करा. मात्र तेही झाले नाही. त्यानंतर कोणत्याही प्रकारे समझोता न होता सगळेच प्रश्न बासनात गुंडाळण्यात आल्याचे दिसते. संघाने सुचविलेला अध्यक्ष हवा, हा संघाचा आदेश कसा पाळला जाईल. हे आम्हाला ठाऊक नाही. पण ही तिन्ही नावे नको असतील तर नितीन गडकरी यांना अध्यक्ष करावे, असे संघाचे म्हणणे आहे. आता हे दोन्ही गुजराती बंधू सरसंघचालक भागवतजींना कसे पटवतात. हे जनता बघतच आहे. मुद्दा आहे तो अमित शहा यांच्या नागपूर दौऱ्याचा. गडकरी गायब तर प्रभारी भूपेंद्र यादव आणि त्यांच्या इतर पदाधिकाऱ्यांसमोर बरेच चर्वीतचर्वण झाले. गडकरी यांच्या आशीर्वादाशिवाय महाराष्ट्रात विजय मिळणे कठीण आहे, असे अनेकांनी बोलून दाखवले. थोडक्यात संघ आणि गडकरी यांच्याशिवाय महाराष्ट्रात सत्ता येऊ शकत नाही. हे दिसून आल्यामुळे दिल्लीश्वरांसमोर बरेच प्रश्न उभे राहिलेले आहेत. संघाची गरज नाही, संघाची गरज नाही, संघाची गरज नाही असे त्रिवार म्हटले तरी संघाशिवाय विजय नाही, संघाशिवाय विजय नाही, संघाशिवाय विजय नाही हेच आता दिसून येत आहे.

# AI चालित भविष्यानुसार भारताच्या वर्कफोर्सची निर्मिती

जनरेटिव्ह AI (GAI) च्या जलद प्रसारामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेमध्ये (AI) क्रांती झाली आहे. हे क्षेत्र आता जागतिक अर्थव्यवस्था आणि कामगार बाजारांच्या संरचनेत मूलभूत बदल घडवून आणण्यास सज्ज आहे. ही बाब जितकी भारताला लागू आहे तितकीच ती उर्वरित जगासही लागू आहे. पूर्वीच्या औद्योगिक आणि इंटरनेट क्रांतीप्रमाणे, बाजारपेठेतील काही क्षेत्रांमध्ये व्यत्यय आणण्याची क्षमता AI क्षेत्रामध्ये आहे. त्याचप्रमाणे इतर क्षेत्रांमध्ये मानवी क्षमता वाढवणे आणि पूर्वी अस्तित्वात नसलेल्या नवीन नोकरीच्या संधी निर्माण करणे याही बाबी साध्य करण्याची क्षमता आहे. AI मुळे अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक क्षेत्रावर परिणाम होणार आहे. अर्थात हा परिणाम प्रत्येक क्षेत्राप्रमाणे बदलत जाईल असे लिंक्डीनच्या डेटामधून सुचित करण्यात आले आहे. GAI च्या स्वरूपामुळे त्यास वेळकाढू कामे पुर्ण कार्यक्षमतेने करता येतात तसेच कामगारांना त्यांची उत्पादकता वाढवण्याची अनुमती मिळते आणि टास्क बेस्ड वर्कफोर्सपासून स्किल फर्स्ट वर्कफोर्सकडे जाण्याचे यातून संकेत मिळतात. ट्रॅक करण्यात ४१००० कौशल्यांपैकी फक्त ५०० कौशल्याची जीआयद्वारे नक्कल करता येते म्हणून जीआयचा उपयोग हा नोकरीच्या बहुतांश संधी आणि कौशल्ये वाढवण्यासाठी करता येऊ शकतो. AI कौशल्यांवर अधिक भर देणारे रिक्रुटर्स आणि लिंक्डीनवर AI जॉबची दुप्पट पोस्टिंग हे जीआयचे सकारात्मक फायदे आहे.

येथे उल्लेख करण्यात आलेली AI कौशल्ये ही केवळ मशीन लर्निंग आणि नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंग यांसारख्या मुख्य १२१ हार्ड AI कौशल्यांपुरती मर्यादित नसून विविध समस्या सोडवणे, संवाद आणि महत्त्वाची विचार-कौशल्ये यांसारख्या मूळत: मानवी, मूलभूत तसेच पूरक सॉफ्ट स्किल्ससाही यात समावेश होतो. जीआय हे विशिष्ट कार्ये पार पाडण्यात पारंगत होत असल्याने, या सॉफ्ट स्किल्सच्या मागणीत लक्षणीय वाढ होत आहे. ही कौशल्ये असणाऱ्यांना हार्ड स्किल्स असलेल्यांपेक्षा बढती मिळण्याची शक्यता १३ टक्क्यांहून अधिक आहे. म्हणून, AI प्रदान करत असलेल्या संधींचा पुरेसा फायदा घेण्यासाठी, कोणत्याही अर्थव्यवस्थेतील कुशल लोकसंख्येसाठी हार्ड आणि सॉफ्ट अशा दोन्ही प्रकारच्या कौशल्यांमध्ये पुरेसे कुशल असणे आवश्यक आहे. याद्वारे ते लोकांच्या कौशल्यांसोबत AI कौशल्ये संतुलित करू शकतात.

विशेष म्हणजे, हार्ड स्किल्ससह भारताची वर्कफोर्स ही AI क्रांतीचा फायदा घेण्यासाठी सुसज्ज आहे. जागतिक स्तरावर भारताचा सापेक्ष AI कौशल्य प्रवेश दर सर्वाधिक आहे. इतर कोणत्याही राष्ट्रापेक्षा जीआय वापरण्याची भारतीय लोकसंख्येची क्षमता तिप्पट आहे आणि भारत हा जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या AI टॅलेंट पूलपैकी एक आहे. भारतातील तरुण, विशेषत: जेनझीज हे नोकरीच्या बाजारपेठेत स्पर्धात्मक धार टिकवून ठेवण्यासाठी स्वत:ला वेगाने विकसित करत आहेत. भारताच्या स्टार्ट-अप इकोसिस्टमने AI सह नवनवीन वापरासाठी उदयोन्मुख तंत्रज्ञानाचा लाभ घेण्याची क्षमता आधीच दाखवली आहे ही एक उल्लेखनीय बाब आहे.

परंतू, लिंक्डइनच्या डेटाने AIच्या आर्थिक फायद्यांचे अधिक न्याय्य आणि शाश्वत वितरण सुनिश्चित करण्यासाठी तीन विशिष्ट अडचणींवर प्रकाश टाकला आहे. या अडचणींवर मात करणे आवश्यक आहे.

सर्व प्रथम, आपण सातत्यपुर्ण कौशल्याच्या युगात प्रवेश करत आहोत. यामध्ये विकसित होत असलेल्या तंत्रज्ञानासोबत जुळवून घेण्यासाठी आणि आउटडेटेड होण्यापासून वाचण्यासाठी कामगारांनी त्यांची कौशल्ये वेगाने आणि सतत वाढवली पाहिजेत. महत्त्वाचे म्हणजे, नजीकच्या भविष्यात आवश्यक असणारी यातील बहुतांश कौशल्ये ही सॉफ्ट स्किल्स आहेत. ही सॉफ्ट स्किल्स इंडस्ट्री आणि सेक्टर अग्नोस्टिक आहेत. ही बाब उच्च शिक्षण आणि करिअरच्या प्रगतीच्या पारंपारिक मॉडेलला आव्हान देणारी आहे. पारंपारिक मॉडेल्समध्ये उद्योग-विशिष्ट हार्ड-स्किल्स ही पदवी आणि करिअर सुनिश्चित करण्यासाठी पुरेशी होती. ही बाब ओळखून, बहुसंख्य कंपन्या (७६ टक्के) आधीच त्यांच्या कर्मचाऱ्यांना अपस्किलिंगमध्ये मदत करत आहेत. विशेष म्हणजे, लिंक्डइन स्वतः व्यावसायिकांना त्याच्या जनरेटिव्ह AI प्रोफेशनल प्रमाणपत्राद्वारे करिअरच्या नवीन संधी शोधण्यात मदत करत आहे. तथापि, भारताच्या आकारमानाच्या आणि विविधतेच्या श्रमिक बाजारपेठेसाठी, तंत्रज्ञानाचे आर्थिक फायदे पूर्णपणे मिळवण्यासाठी संपूर्ण कामगार स्पेक्ट्रममध्ये काही बेसलाइन कोर GAI आणि GAI पूरक सॉफ्ट कौशल्ये विकसित करणे आवश्यक आहे.

सर्व प्रथम, आपण सातत्यपुर्ण कौशल्याच्या युगात प्रवेश करत आहोत. यामध्ये विकसित होत असलेल्या तंत्रज्ञानासोबत जुळवून घेण्यासाठी आणि आउटडेटेड होण्यापासून वाचण्यासाठी कामगारांनी त्यांची कौशल्ये वेगाने आणि सतत वाढवली पाहिजेत.

दुसरी बाब म्हणजे ज्या नोकऱ्यांमध्ये अडव्हांस डिग्री आवश्यक आहे आणि सामान्यत: त्या जास्त पगाराच्या आहेत अशा नोकऱ्यांमध्ये अल्पावधीत जीआयमुळे व्यत्यय येण्याची शक्यता आहे. या आधीच्या तंत्रज्ञानातील क्रांतीमध्ये प्रामुख्याने लेबर स्पेक्ट्रमच्या खालच्या स्तरावर परिणाम झाला होता. या पार्श्वभुमीवर हा एक अभूतपूर्व आर्थिक विकास आहे, जिथे आर्थिक स्तराचा वरचा भाग तांत्रिक बदलामुळे खालच्या भागापेक्षा अधिक प्रभावित होणार आहे. भारताची आयटी वर्क फोर्स ही भारताच्या मध्यमवर्गाचा आणि आर्थिक बाबींचा कणा आहे. नजीकच्या भविष्यात, भारताच्या आयटी वर्क फोर्सवर GAI वरील वाढत्या अवलंबनामुळे परिणाम होण्याची शक्यता आहे. हे अवलंबन वेळेत कमी केले नाही तर काही आर्थिक अडथळे निर्माण होण्याची शक्यता आहे, असे सुचित झाले आहे. तंत्रज्ञान, माहिती आणि मीडिया क्षेत्रामध्ये GAIद्वारे व्यत्यय येण्याची सर्वाधिक शक्यता आहे, हे ही लिंक्डइनच्या डेटाद्वारे सिद्ध झाले आहे. अडव्हांस डिग्री असलेल्यांना उच्च कौशल्य प्राप्त करण्याच्या संधीचा वापर करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. तसेच त्यांच्याकडे आधीपासूनच काही मूलभूत तांत्रिक क्षमता असल्याने पुरेशा उच्च कौशल्याच्या संधी अस्तित्वात आहेत.

तिसरी बाब म्हणजे, श्रमिक बाजारपेठेतील लिंग या घटकावर GAI असममित प्रभाव टाकण्याची शक्यता आहे. AIमुळे उपलब्ध होत असलेल्या नोकरीच्या संधींमध्ये महिलांवर अधिक नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आहे. तसेच नवीन संधींचा फायदा घेण्यासाठीचे उचित कौशल्य महिलांकडे असण्याचीही शक्यता कमी आहे. अर्थात AIसाठी ही बाब विशेष नसली तरी यामुळे तंत्रज्ञान उद्योगातील मोठा संरचनात्मक फरक अधोरेखित झाला आहे. इतर अर्थव्यवस्थांच्या तुलनेत भारतीय अर्थव्यवस्थेत महिलांचा वाटा तुलनेत कमी असल्याने ही भारतासाठी चिंताजनक बाब आहे. लिंक्डइनच्या इकॉनॉमिक ग्राफ डेटानुसार, AI टॅलेंटमध्ये केवळ २५.६ टक्के महिला सहभागी आहेत. त्यामुळे महिलांनी AI लाटेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक AI कौशल्ये प्राप्त करण्यासाठी संधी निर्माण करणे अत्यावश्यक आहे.

स्किल इंडिया मिशनमध्ये AI मुळे मिळणाऱ्या संधींचा फायदा घेण्यासाठी भारतातील बहुसंख्य कर्मचाऱ्यांना सक्षम करण्यासाठी महत्त्वाच्या सॉफ्ट स्किल्ससह GAI कौशल्यांचे मॉड्यूल समाविष्ट केले जाऊ शकते.

या चिंता विशिष्ट धोरणात्मक पुढाकाराने दूर केल्या जाऊ शकतात. उदाहरणार्थ, स्किल इंडिया मिशनमध्ये AIमुळे मिळणाऱ्या संधींचा फायदा घेण्यासाठी भारतातील बहुसंख्य कर्मचाऱ्यांना सक्षम करण्यासाठी महत्त्वाच्या सॉफ्ट स्किल्ससह GAI कौशल्यांचे मॉड्यूल समाविष्ट केले जाऊ शकते. यासोबतच, शालेय आणि महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांना लहान वयातच जीआयची ओळख करून दिल्यास त्याचा फायदा त्यांना तंत्रज्ञान आणि त्याच्या अनुप्रयोगांशी परिचित होण्यासाठी होईलच पण त्यासोबत भारताच्या भावी कर्मचाऱ्यांच्या बेसलाइन कौशल्याच्या स्तरांमध्ये सुधारणा करण्यासाठी देखील हे शिक्षण उपयुक्त ठरणार आहे. व्यापक व सतत विकसित होत असलेल्या कौशल्य फ्रेमवर्क आणि अधिक उद्योग-शैक्षणिक सहकार्यावर आधारित प्रशिक्षणावर भर देणाऱ्या लवचिक शिक्षण प्रणालीमुळे श्रमशक्तीच्या क्षमता बदलत्या रोजगाराच्या आवश्यकतांशी सुसंगत होण्यास मदत होणार आहे. शेवटी, विद्यमान आर्थिक अंतर भरून काढण्यासाठी महिला आणि उपेक्षित गटांना AI कौशल्ये अवगत करण्यासाठी डिझाइन करण्यात आलेल्या महत्त्वाच्या धोरणांवर विशेष भर दिला जाऊ शकतो.

महत्त्वाचे म्हणजे, GAI ला भारतातील अध्यापनशास्त्र आणि कौशल्य प्रशिक्षणाचे एक अनिवार्य साधन बनवले जाऊ शकते आणि प्रशिक्षण व ज्ञान हस्तांतरणाचा खर्च लक्षणीयरित्या कमी करण्यासाठी त्याचा फायदा घेतला जाऊ शकतो. जीआयमुळे विविध भाषांमध्ये अचूक भाषांतर करता येऊ शकते. याचा वापर करून भारतातील कामगार त्यांच्या आवडीच्या भाषेत कौशल्यांचे शिक्षण घेऊ शकतात. काही परिस्थितींमध्ये अपस्किल करण्यासाठी इंग्रजीमध्ये काही प्रमाणात प्रवीणता असणे आवश्यक असते. याच पार्श्वभुमीवर सध्या अस्तित्वात असलेल्या भाषिक अडथळ्यावर मात करता येऊ शकते.

AI युगामध्ये विविध संधींचा फायदा घेण्यासाठी कामगार आणि धोरणकर्त्यांच्या विचारांमध्ये बदल आणणे गरजेचे आहे. जॉब मार्केटमधील कौशल्यांच्या मागणीच्या तुलनेत AI कौशल्यांचा विचार करत असताना, भारतीय श्रमशक्तीची एकूण तयारी आणि स्थिती यांचा बारकाईने अभ्यास केल्यास विद्यमान विचारधारा आणि कृती यांच्यात बदल घडवता येऊ शकेल.

# बेलासिस पुलाच्या पुनर्बांधकामासाठी पालिका खर्च करणार 100 कोटी रुपये

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई सेंट्रल रेल्वे स्थानक आणि ग्रँट रोड रेल्वे स्थानक यांच्यामधील बेलासिस पुलाचा सध्याचा पोहोच रस्ता निष्कासित करून पुलाचे पुनर्बांधकाम केले जाणार आहे. पालिका यासाठी एकूण ९९ कोटी ७८ लाख ३० हजार रुपये खर्च करणार आहे. या कामाला मंजुरी देण्याची प्रक्रिया मुंबई महापालिकडून सुरू करण्यात आली आहे.

पश्चिम रेल्वे मार्गावरील पुलांचे आयुर्मान लक्षात घेता पालिकेशी संबंधित पुलांच्या पुनर्बांधणीचे काम महाराष्ट्र रेल्वे इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (एमआरआयडीसीएल) कडे सोपविण्यात आले होते. मध्यंतरी पश्चिम रेल्वे प्राधिकरणाने तातडीची बाब म्हणून ग्रँट रोड आणि चर्नी रोड रेल्वे स्थानकांदरम्यानच्या फेरेरे पुलाचे रिगर्डीरींग म्हणजेच तुळयांची पुनर्स्थापना तसेच पोहोच रस्त्याच्या मजबुतीकरणाचे काम हाती घेतले. त्यानंतर नोव्हेंबर २०२१ मध्ये हा पूल वाहतुकीस खुला करण्यात आला. रेल्वे पुलांच्या रिगर्डीरिंगची प्राथमिक तपासणी आणि व्यवहार्यता अहवाल देण्यासाठी पालिकेने व्हीजेटीआय या संस्थेची नियुक्ती केली होती. बेलासिस पुलाच्या रिगर्डीरिंगचे काम फेरेरे पुलाच्या धर्तीवर करता येईल, असा अहवाल या संस्थेने दिला होता. त्यानुसार हे काम करण्यासाठी एमआरआयडीसीएल कंपनीला कळविण्यात आले. या कंपनीने त्याला प्रतिसाद दिला नाही. त्यानंतर बेलासिस पुलाच्या पुनर्बांधणीचे काम करण्याची तयारी पश्चिम रेल्वेने दाखविली. त्याला संबंधित प्राधिकरणांनी मंजुरीही दिली होती.

पश्चिम रेल्वे प्रशासनाने बेलासिस पुलाच्या पोहोच रस्त्याच्या मजबुतीकरणाची व्यवहार्यता तपासली असता या कामासाठी बाजूला जागा उपलब्ध नसल्याचे दिसून आले. अशी जागा मिळविण्यासाठीचा संभाव्य अवधी आणि वेळ लक्षात घेता हा पूल आहे तेथेच पुनर्बांधणी करण्याचा पर्याय पुढे आला. पुलाच्या रेल्वे हद्दीतील भागाची पुनर्बांधणी रेल्वे प्राधिकरणाने, तर पालिकेच्या हद्दीतील पोहोच रस्त्याची पुनर्बांधणी पालिकेच्या पूल खात्याकडून करण्याचा निर्णय झाला. पालिकेच्या हद्दीतील कामासाठी टीपीएफ या सल्लागार कंपनीने ७२ कोटी २१ लाख ९३ हजार रुपये खर्चाचे कार्यालयीन अंदाजपत्रक तयार केले होते. या कामासाठी निविदा मागवल्या असता पिनाकी इंजिनिअर्स अँड डेव्हलपर्सची उणे १२.६२ टक्के दराची निविदा लघुत्तम ठरली. त्याशिवाय वितराग इन्फ्राची उणे २१.२८ टक्के, साई प्रोजेक्टसची उणे १२.१० टक्के आणि मंगलम बिल्डकॉनची उणे २.७० टक्के दराची निविदाही पालिकेकडे आली होती. त्यापैकी पिनाकीची निविदा मंजुर करण्याची शिफारस करण्यात आली आहे.

या कामासाठी महापालिकेला कार्यालयीन अंदाजापेक्षा उणे १२.६२ टक्के इतक्या लघुत्तम दराची निविदा प्राप्त झाल्याने मंजुरीसाठी तिची शिफारस करण्यात आली आहे. शिवाय या कामासाठी तांत्रिक सल्लागाराला एक कोटी सात लाख ९६ हजार रुपये दिले जाणार आहेत. याबाबतचा प्रस्ताव स्थायी तसेच सुधार समितीच्या म्हणजेच प्रशासकांच्या मंजुरीच्या प्रक्रियेत असल्याचे सांगण्यात आले.



### असे होणार प्रकल्पाचे काम

- पुलाची लांबी- पूर्वेस १३८.३९ मीटर.पश्चिमेस- १५७.६८१ मीटर. पुलाची रुंदी- २० मीटर.
- गाळ्यांची (स्पॅन) संख्या- पूर्वेस ५, पश्चिमेला ५, एकूण १०. स्पॅनची एकूण लांबी- २० मीटर.
- पाया बांधकाम- आरसीसी पाईल्स अधिक पाईल कॅप. बांधकामाचा प्रकार- स्टील गर्डर आणि आरसीसी डेक स्लॅब.

### पोहोच रस्त्याचे निष्कासन व पुनर्बांधणीचा खर्च

कंत्राट खर्च- ६३ कोटी १० लाख ५२ हजार रुपये.एकूण कंत्राट- ८१ कोटी १६ लाख ५९ हजार रुपये. अन्य कर, सल्लागार आदीसह अंदाजित खर्च-९९ कोटी ७८ लाख ३० हजार रुपये.

# मुंबईत दहशतवादी हल्ल्याची भीती; पोलीस अलर्ट मोडवर, गर्दीच्या ठिकाणी वाढवली गस्त

प्रतिनिधी
■ मुंबई

दहशतवाद्यांकडून मुंबईला धोका असल्याची माहिती सेंट्रल एजन्सीनं मुंबई पोलिसांना दिली आहे. याच पार्श्वभूमीवर मुंबई पोलीस सतर्क झाल्याचं पाहायला मिळतंय. दहशतवाद्यांकडून मुंबईला धोका असल्याच्या माहितीनंतर मुंबई पोलीस अलर्ट मोडवर असून गर्दीची ठिकाणं आणि धार्मिक स्थळांवर मुंबई पोलिसांकडून नजर ठेवली जात आहे. शहरात तगडी सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे.

मुंबईला दहशतवादी हल्ल्याचा धोका असल्याची माहिती केंद्रीय गुप्तचर यंत्रणांना मिळाली. त्यामुळे केंद्रीय गुप्तचर यंत्रणेनं मुंबई पोलिसांना सतर्क राहण्याच्या सूचना जारी केल्या आहेत. मुंबई पोलिसांनी शहरात तगडी सुरक्षा व्यवस्था तैनात केली आहे. शहरातील गर्दीची धार्मीक स्थळं आणि गर्दीच्या ठिकाणांवर पोलीस जवानांना तैनात करण्यात आलं आहे. शहरातील गर्दीच्या ठिकाणांची झाडाझडती घेतली जात आहे. या पार्श्वभूमीवर पोलीस अधिकाऱ्यांकडून मॉकड्रील घेण्यात येत आहे.

मुंबई शहरातील विविध पोलीस ठाण्यातील पोलीस उपायुक्तांना अलर्ट मोडवर राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळं पोलीस उपायुक्त दर्जाचे अधिकारी गस्तीवर आहेत. खबरदारीचा उपाय म्हणून काही संशयास्पद हालचालींची माहिती मिळाल्यास ती तत्काळ पोलीस मुख्यालयाला कळवण्यात यावी, असे आदेश देण्यात आले आहेत. तसंच शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी तगडा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आलाय.



### क्रॉफर्ड मार्केट परिसरात पोलिसांचे मॉक ड्रिल

*केंद्रीय गुप्तचर यंत्रणांनी मुंबईला संभाव्य दहशतवादी हल्ल्याचा धोका असल्यानं अलर्ट करण्यात आलं आहे. शहरातील गजबजलेलं ठिकाण असलेल्या क्रॉफर्ड मार्केट परिसरात पोलिसांचं मॉक ड्रिल करण्यात आलं आहे. यावेळी पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितलं की, "दहशतवादी धोक्याचा इशारा मिळाल्यानं नागरिकांनी सतर्क राहावं. आगामी विधानसभा निवडणूक असल्यानं देखील सुरक्षेची विशेष काळजी घेण्यात येत आहे."*

# 'मायबीएमसी सचेत' ॲप्लिकेशनद्वारे कळणार क्षेत्रीय कामकाजांची वास्तविक स्थिती

### सध्या प्रायोगिक तत्वावर ॲप्लिकेशनची सुरुवात, १ ऑक्टोबर २०२४ पासून पूर्णवेळ उपलब्ध

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईतील विविध प्रशासकीय विभाग (वॉर्ड) स्तरावरील परिरक्षण (मेंटेनन्स), घनकचरा व्यवस्थापन, इमारती आणि कारखाना विभागाच्या संबंधित कामकाजाचे संनियंत्रण आणि त्यात सुलभता आणण्याच्या उद्देशाने क्षेत्रीय कामकाजांची (फिल्ड वर्क) वास्तविक स्थिती जाणून घेण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीने मायबीएमएसी सचेत ॲप्लिकेशन (MyBMC Sachet app) तयार करण्यात आले आहे. सध्या हे मोबाईल ॲप्लिकेशन प्रायोगिक तत्वावर सुरू करण्यात आले आहे. येत्या १ ऑक्टोबर २०२४ पासून ते संबंधित कर्मचाऱ्यांसाठी पूर्णवेळ उपलब्ध असेल.

पालिकेच्या माहिती तंत्रज्ञान विभागाने भौगोलिक माहिती तंत्रज्ञानावर (जीआयएस) आधारित मायबीएमसी सचेत ॲप्लिकेशनची निर्मिती केली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभागांतील कर्मचारी, अधिकारी नियमितपणे क्षेत्रीय कामकाज (फिल्ड वर्क) करत असतात. त्यांच्याकडून केल्या जाणाऱ्या कामकाजामधील पारदर्शकता, विश्वसनीयता आणि क्षेत्रीय कामकाजाच्या व्यवस्थापनात सुधारणा व्हावी, या उद्देशाने मायबीएमएसी सचेत ॲप्लिकेशन (MyBMC Sachet app) तयार करण्यात आले आहे.

सध्या हे मोबाईल ॲप्लिकेशन अँड्रॉईड प्लॅटफॉर्मवर आणि प्रायोगिक तत्वावर सुरू करण्यात आले आहे. लवकरच हे ॲप्लिकेशन आयओएस प्लॅटफॉर्मवरही उपलब्ध केले जाणार आहे. १ ऑक्टोबर २०२४ पासून ते संबंधित कर्मचारी आणि अधिकाऱ्यांसाठी पूर्णवेळ उपलब्ध होईल, असे महानगरपालिका प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.

# कांदिवलीत लोखंडवाला ते ठाकूरगाव 120 फूट डीपी रोडवरून भाजप - शिवसेनेत उफाळला वाद

प्रतिनिधी
■ मुंबई

कांदिवली लोखंडवाला ते ठाकूर गाव १२० फूट डीपी रस्त्याबाबत वाद सुरूच आहे. काल भाजप आमदार अतुल भातखळकर यांनी डीपी रोडवरून मधला मार्ग काढण्यासाठी आंदोलन केले होते. दुसरीकडे डीपी रोडला मध्यम मार्ग काढण्यास शिवसेनेच्या(शिंदे गट) कार्यकर्त्यांनी विरोध केला.

मात्र भाजपचे माजी खासदार गोपाळ शेट्टी यांनी या प्रकरणावरून मागाठाणेचे शिवसेनेचे आमदार प्रकाश सुर्वे यांचा समाचार घेतला. ते म्हणाले की, प्रकाश सुर्वे यांना वाटते की, ते डीपी रोडचे अलाइनमेंट बदलतील, पण ते इतके सोपे नाही. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी पुढे येऊन संरेखन बदलता येईल असे सांगितले तर ते मी स्वतः जनतेला समजावून सांगेन. आमदार अतुल भातखळकर यांच्या विरोधात काही लोकांनी केलेली घोषणाबाजी मला आवडली नाही. आता गोष्टी बिघडत चालल्या आहेत. भातखळकर यांना डीपी रोड पूर्वीच खुला करता आला असता, राज्यातील जनतेला न्याय मिळावा म्हणून ते शांत होते. मात्र यावर आता निर्णय व्हायला हवा. असेही गोपाळ शेट्टी म्हणाले.

शेट्टी यांनी महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्यावरही निशाणा साधला आहे. येणाऱ्या काळात गगराणी बदनाम होणार असून, त्यांना उत्तर देणे कठीण होणार आहे, तेही अडकू शकतत, असेही ते म्हणाले.

# बॅकबे रिक्लेमेशन स्कीम सुधारित विकास योजना मसुदा कायमचा रद्दबातल करा!

### मच्छिमार संघटनेची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (MMRDA) १५८ व्या बैठकीत बॅकबे रिक्लेमेशन स्कीम (ब्लॉक III ते VI) साठी सुधारित मसुदा विकास आराखडा राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे ह्यांना सादर करण्यात आला आहे. ह्या सुधारणेमध्ये इतर सरकारी आणि गैर-सरकारी संस्थांद्वारे सुरू असलेल्या प्रकल्प तसेच झोपडपट्टी पुनर्वसन आणि मेट्रो प्रकल्पांसह क्षेत्र विकास योजना पुनरावृत्ती करण्याची परवानगी देण्यात आल्याने स्थानिक भूमिपुत्र मच्छिमारांना आपल्या व्यवसायाच्या भविष्याबबत भीती निर्माण झाली आहे. म्हणून मुख्यमंत्र्यांच्या निर्णयाचा विरोधात मच्छिमार संघटनेनी भूमिका घेतली असल्याची माहिती अखिल महाराष्ट्र मच्छिमार कृती समितीचे अध्यक्ष देवेंद्र तांडेल यांनी दिली.जर ह्या विकास आरखड्यामुळे एकही कोळी बांधव बेघर होणार असेल तर ह्या सरकारला आणि प्राधिकरणाला जसाच तसे उत्तर देण्यात येईल आणि हा प्रस्तावित विकास आराखड्याच्या विरोधात मच्छिमार समाज रस्त्यावर उतरून उग्र आंदोलन केल्याशिवाय राहणार नाही.असा इशाराही देवेंद्र तांडेल यांनी दिला आहे.

मच्छिमार समितीकडून राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बुधवारी ईमेल द्वारे हा अपरिपक्व आणि बिल्डर लोबीच्या हिताचा विकास आराखडा रद्दबातल करण्याची मागणी करण्यात आली आहे. कोस्टल रोडमुळे मासेमारी संकटात येणार असल्याची भीती मच्छिमारांकडून व्यक्त होत असल्याने सदर मसुद्यात चित्रित केलेल्या समुद्रातील कोस्टल रोड हा समुद्रात पूल स्वरूपात उभारणार अथवा संपूर्ण मार्गिका नरिमन पॉईंट ते गीता नगर पर्यंत समुद्रात भराव टाकून उभारणी करण्यात येणार आहे किंवा नाही ह्याचा खुलासा करण्याचे आवाहन प्राधिकरणाला करण्यात आले आहे. तसेच हायवेची व्याख्या एका महानगरपालिकेला दुसऱ्या महानगर पालिकेशी जोडणारा रस्ता म्हणजे हायवे असे असून सदर रेखांकित रस्त्याला हायवे संबोधून सदर रस्ते किती महत्वाचे आहे हा समज जनतेच्या मनात निर्माण करण्याचा प्रयत्न MMRDA प्राधिकरणाकडून होत असून ही जनतेची फसवणूक असल्याचा आरोप तांडेल यांनी केला आहे.

सदर विकास आराखड्या अंतर्गत निरनिराळे प्रस्तावित प्रकल्प कुठल्या संस्थेच्या मागणीमुळे अथवा कुठले निकष लावून हा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे याचा खुलासा समितीने प्राधिकरणाकडून मागितला आहे. विकासकांच्या (बिल्डर लॉबी) हितासाठी हा आटापिटा सुरु असल्याचा आरोपही मच्छिमार समितीकडून निवेदनात करण्यात आला आहे. ह्या संपूर्ण प्रकल्पात सी.आर.झेड कायद्याचे मोठ्या प्रमाणावर उल्लंघन होणार असल्याने समुद्रातील जैविविधता लक्षात न घेता बनविण्यात आलेल्या मसुद्याला मच्छिमार समाजाकडून विरोध दर्शविण्याात आला आहे.

भूखंड क्रमांक १०६ ते १०९ ह्या भूखंडावर कोळी बांधव मोठ्या संख्येने राहत असून सदर भूखंडावरील कोळी बांधवांचे भवितव्य उध्वस्त करणारा मसुदा MMRDA प्राधिकरणाकडून निर्माण करण्यात आला आहे तसेच भूखंड क्रमांक १४३ हा भूखंड मच्छिमार वसाहत म्हणून राखीव असून ह्या भूखंडावर मच्छिमार आपल्या मासेमारी बोटींची डागडुजी करीत असतात आणि ह्या भूखंडावर नवीन आराखड्यामध्ये “food kiosk” म्हणून राखीव दर्शविण्यात आले असून हा भूखंड मच्छिमारांच्या नावे करण्यासाठी जिल्हाधिकारी मुंबई शहर ह्यांच्या कार्यालयातून प्रस्तावना करण्यात आल्याने ह्या भूखंडावर MMRDA प्राधिकरणाकडून अतिक्रमण होत असल्याचा दावा तांडेल यांनी केला आहे.

समुद्रात मच्छिमार अनेक वर्षांपासून आपली उपजीविका परंपरागत पध्दतीने करीत असल्याने समुद्राखालच्या जागेवर मच्छिमारांना परंपरागत अधिकार "द इंडियन इसमेन्ट ॲक्ट १८८२" मधील ह्या कायद्याने दिले असून समुद्रात कुठलाही प्रकल्प करण्याआधी मच्छिमार समाजाबरोबर संवाद साधल्याशिवाय प्रकल्प करणे ही कायद्याची पायमल्ली करण्यासारखे आहे. तसेच समुद्रात खाजगी बोटींना नांगरण्यासाठी प्रयोजन करण्यात आले आहे. हे प्रयोजन मच्छिमारांना आपल्या उप जिविकेपासून वंचित ठेवण्यात येत असल्याने भारतीय संविधानाच्या परिशिष्ट २१ चे उल्लंघन MMRDA करीत असल्याने हा प्रकल्प रद्दबातल करण्याची मागणी मच्छिमारांकडून निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# पालिकेच्या करनिर्धारण व संकलन' खात्यातील ‘निरीक्षक’ संवर्गाची रिक्त पदे खात्यांतर्गत भरा

### म्युनिसिपल कर्मचारी सेनेची मागणी

प्रतिनिधी
■ मुंबई

खात्यांतर्गत कर्मचा-यांवरील अन्याय निवारणाबाबत न्यायीक दाव्याचा निकाल प्रलंबित असल्याने ‘निरीक्षक’ पदांच्या बाह्य -भरतीचे प्रयोजन स्थगित करून, करनिर्धारण व संकलन खात्यातील ‘निरिक्षक’ संवर्गाची रिक्त पदे खात्यांतर्गत उत्तीर्ण ऊमेदवारांमधुनच भरावीत अशी मागणी ‘म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेने’ चे अध्यक्ष बाबा कदम व उपाध्यक्ष डॉ.संजय कांबळे-बापेरकर यांनी पालिका प्रशासनाकडे केली आहे.

दि. 22-07-2016 रोजीच्या क्रमांक- कवसं/001/आस्था अन्वये अंतर्गत भरतीबाबतच्या जारी परिपत्रकानुसार 'करनिर्धारक व संकलक ' खात्यातील विभाग निरीक्षक /कनिष्ठ सर्वेक्षक / जकात निरीक्षक संवर्गातील 218 रिक्त पदांसाठी लेखी परिक्षा घेण्यात आली होती. त्यामध्ये एकूण 236 उमेदवार उत्तीर्ण झाले. मात्र केवळ 170 गुणवत्ताधारक (Merit) उमेदवारांची नियुक्तीसाठी यादी प्रसारीत करण्यात आली. यापैकी केवळ 154 उमेदवार उपलब्ध झाले त्यांना तदर्थ तत्वावर नियुक्ती दिली गेली. मात्र 16 रिक्त पदे, परिपत्रकानुसार प्रतिक्षा यादीतून भरावयाची होती त्याचा निर्णय 'करनिर्धारण व संकलन' खात्याने अद्याप घेतलाच नाही. या अन्यायाबाबतची तक्रार आयुक्त यांना 20 डिसेंबर 2016 रोजी करण्यात आली होती. असे नमूद करून या 154 तदर्थ तत्वावरील निरिक्षकांपैकी कालांतराने 45 निरीक्षकांनी मूळ खात्यात व आधीच्या मूळ पदावर प्रत्यावर्तीत(Revert) होणे पसंद केले. उर्वरीत 109 तदर्थ तत्वावरील निरीक्षक व सदर भरती कायम ठेवण्याबाबतचा सुमारे तीन वर्षे चाललेला न्यायालयीन लढा मागे घेण्याच्या अटीसापेक्ष एकूण 81 निरीक्षकांना तदर्थ तत्वावरुन नियमीत करण्यात आले व अन्य27 जणांना जसजशी पदे रिक्त होतील त्याप्रमाणे नियमीत करण्यात येईल असा पालिका प्रशासनाने निर्णय घेतला. परंतु या प्रकरणातील प्रतिक्षा सूचीवरील दुर्लक्षीत 55 उत्तीर्ण उमेदवारांना निरीक्षक पदावर सामावून घेण्याबाबत प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतली नाही.

सदर प्रकरण "राष्ट्रीय अनुसुचीत जाती आयोग", नवी दिल्ली यांच्या न्यायकक्षेत असल्याने निदान सुनावणी होऊन निकाल लागेपर्यंततरी बाह्य भरतीबाबतचा निर्णय घेऊ नये अथवा त्यांस मंजूरी देण्यात येऊ नये अशी विनंती संघटनेने केली असुन, आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडे चर्चेसाठी वेळ मागितली आहे.

# 300 कोटी नुकसान करणारी लोअर परळची 520 कोटींची नवीन कार पार्किंग

■ मुंबई

एलेव्हेटेड मल्टीलेव्हल इलेक्ट्रोमेकॅनिकल कार पार्किंग सिस्टीम (शटल आणि रोबो पार्कर सिस्टीम) माटुंगा, मुंबादेवी, फोर्ट आणि वरळी अंतर्गत यापूर्वी झालेले नुकसान लक्षात न घेता पुन्हा जी दक्षिण लोअर परळ येथील अस्फाल्ट प्लांट येथे 548 कार पार्किंगचे 520 कोटींचे जारी केलेली निविदा रद्द करत कंत्राटदार आणि अधिकारी यांचे संगनमत लक्षात घेता कारवाई करण्याची मागणी आरटीआय कार्यकर्ते अनिल गलगली यांनी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि पालिका आयुक्त यांच्याकडे केली आहे. 300 कोटी नुकसान करणारी लोअर परळची 520 कोटींची नवीन कार पार्किंग असणार आहे.

अनिल गलगली यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच पालिका आयुक्त भूषण गगराणी यांस पाठविलेल्या पत्रात उल्लेख केला आहे की यापूर्वी करण्यात आलेल्या तक्रारीची कोणतीही दखल न घेता अधिकारी वर्गाने जी दक्षिण लोअर परळ येथील अस्फाल्ट प्लांट येथे 548 कार पार्किंगचे 520 कोटींचे नवीन निविदा जारी केल्या आहेत. प्रत्येक कार मागे 95 लाख खर्च येत आहे. यामुळे या निविदेत 300 कोटींचे नुकसान होईल. या निविदेतही मूळ उपकरणे उत्पादन भागीदार सर्व निविदाकारात एकच म्हणजे मेसर्स सोटेफिन पार्किंग प्रायव्हेट लिमिटेड असेल यात काडीमात्राची शंका नसेल.

यापूर्वी पालिकेने कार्यादेश दिले आहेत त्यात माटुंगा, फ्लोरा फाउंटन आणि वरळी येथील पार्किंगचा समावेश आहे. फ्लोरा फाउंटन ( विशाल कंन्स्ट्रक्शन ) येथे 70 कोटीत 176 कार पार्किंगचे कंत्राट देण्यात आले आहे. प्रति कार हा खर्च 39.77 लाख आहे. वरळी ( श्री इंटरप्रायझेस ) येथे 640 कार पार्किंगचे काम 216.94 कोटीत देण्यात आले असून प्रति कार हा खर्च 33.90 लाख आहे तर माटुंगा ( रेलकोन इन्फ्रास्ट्रक्चर प्रोजेक्ट) येथे 475 कार पार्किंगचे काम 103.87 कोटीत देण्यात आले असून प्रति कार हा खर्च 21.87 लाख आहे. त्याचशिवाय एमएमआरडीएच्या मालवणी येथे 669 कार पार्किंगचे काम 150 कोटीत देण्यात आले असून तेथे हा खर्च प्रति कार 22.42 लाख इतका आहे.

# टिळकनगरमध्ये हक्काच्या घरासाठी नवीन सदनिकाधारकांचा अन्यायाविरुद्ध उठला आवाज

### इमारत क्र. १८ च्या सदनिकाधारकांनी बिल्डर आणि सोसायटीच्या विरोधात पुकारले निषेध आंदोलन

प्रतिनिधी
■ मुंबई

टिळक नगर चेंबूर येथील टिळक नगर सहयोग सहकारी गृहनिर्माण सोसायटीतील नवीन सदनिका खरेदी केलेल्या सदस्यांनी शुक्रवारी संध्याकाळी निषेध आंदोलन पुकारून नवीन सदनिकाधारकांवर वरद वास्तू बिल्डर आणि सोसायटीकडून होणाऱ्या अन्यायाविरोधात आवाज उठवला आहे. पुनरविकासात इमारत बांधून पूर्ण करण्यासाठी विकासक नव्या सदनिका धारकांना अतिरिक्त घर विक्री करून पैसा उभारत असतो अशात ज्या लोकांनी कर्जाने घर घेतली त्यांना रीडेव्हलपमेंट मध्ये घर मिळत नाहीत अशीच परिस्थिती टिळक नगरच्या इमारत क्रमांक 18 मधील नवीन सदनिका धरकांवर आल्यामुळे या सदनिकाधारकांना रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची वेळ आली.



टिळक नगर सहयोग सहकारी गृहनिर्माण सोसायटी इमारत क्रमांक १८ मधील २४ नवीन सदनिका खरेदी केलेल्या सदस्यांना म्हाडा चे डेप्युटी रजिस्टर, डीव्हीजनल जॉईंट रजिस्टर (मुंबई विभाग) सहकार मंत्री तसेच तहसीलदार आणि कार्यकारी दंडाधिकारी कुर्ला आदी सर्व आस्थापणांकडून मेंबरशिप विषयी आदेश देऊन सुद्धा सोसायटी आणि वरद वास्तू विकासाकाने नवीन सदनिका धारकांना घर नाकारली आहेत. या त्रासदायक प्रकाराविरोधात या सदनिका धारकांनी शुक्रवार दिनांक २७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता इमारत क्रमांक १८ समोर लोकशाही मार्गाने निषेध आंदोलनाचा पविता घेतला आणि आपल्या त्रिव्ह भावना व्यक्त करत निषेध केला.

याप्रसंगी येथील सदस्य विजय मोरे यांच्यासह २३ नवीन सदनिका धारकांच्या पाठीशी उभे राहण्यासाठी भाजपा अनुसूचित जाती मोर्चा मुंबई उपाध्यक्षा स्नेहा भालेराव, आरपीआय राजेश कटारनवरे, काँग्रेस यतीन साळवी, विशाल बिले, मधुकर साळवी, टिळकनगर फेडरेशन, ज्येष्ठ नागरिक समूह सुनील कनोजिया, शशिकांत मोरे आदीसह अन्य सामाजिक कार्यकर्ते या निषेध आंदोलनात उपस्थित होते. यावेळी उपस्थित अन्याय ग्रस्त नवीन सदनिकाधारकांनी विकासक व सोसायटीच्या प्रति निषेध व्यक्त केला. टिळक नगर सहयोग सहकारी सोसायटीमध्ये येथील मूळ विकासक महालक्ष्मी बिंदू डेव्हल्पर्स ने या 24 सदस्यांना घर विकली होती विकासकाच्या मृत्यू नंतर सोसायटीने वरद वास्तू विकासकाची निवड केली आणि नव्या पुरवविकासात या 24 सदनिका धारकांचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे प्रकरण कोर्टात गेले स्टे आणि स्टे मिळत असल्याने सदनिका धारक बेहाल झाले असून अखेर मुख्यमंत्री या विषयी लक्ष घालतील अशी अपेक्षा आता निषेध आंदोलनाच्या माध्यमातून रहिवासी करत आहेत.

# पारधी समाजाच्या मानखुर्दमधील वसाहतीत स्वच्छता मोहीम

### सोलापूरच्या शासकीय अधिकाऱ्यांकडून पाहणी

प्रतिनिधी
■ मुंबई

मुंबईतील मानखुर्द येथील पारधी वसाहतीत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेअंतर्गत सोलापूर येथील प्रशासकीय अधिकारी झाकडे , सरतापे यांनी भेट देऊन मुंबईतील पारधी वसाहतीचा समस्यांचा आढावा घेतला. यावेळी आदिवासी पारधी महासंघाचे मुंबई ,नवी मुंबई अध्यक्ष व कॉंग्रेस पक्षाचे पारधी समाज महाराष्ट्र सेल अध्यक्ष संतोष एकनाथ पवार यांनी उपस्थित पारधी

उपस्थित.होते. त्यांनी अधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

सोलापूर, उस्मानाबाद जिल्ह्यातील पारधी समाजाच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करून ते प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासकीय पातळीवर प्रयत्न केले पाहिजे, अशी मागणी यावेळी संतोष पवार यांनी लावून धरली. यावेळी प्रशासकीय अधिकाऱ्यानी पारधी समाजाच्या प्रश्नांवर सकारात्मक प्रतिसाद देऊन हे प्रश्न तातडीने सोडविण्याचे आश्वासन दिले.

यावेळी आदिवासी पारधी मुंबई, नवी मुंबई, ठाणे ,रायगड जिल्ह्यातील कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला. नवी मुंबईतील केरला भवन समोरील आदिवासी पारधी वसाहतीच्या पुनर्वसन बाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली. आदिवासी पारधी समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचार विरोधात प्रशासकीय पातळीवर योग्य ते निर्णय घेण्याचे ठराव पारित करण्यात आले. यावेळी भीषण काळे, सोमनाथ पवार, शहाजी पवार, लक्ष्मण काळे आदी आदिवासी पारधी समाजातील कार्यकर्ते पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शरीर से टॉक्सिंस बाहर निकालने के लिए ट्राई करें ये 5 डिटॉक्स टी, नहीं होगी भूखे रहने की जरूरत

तरह-तरह के खाद्य पदार्थ, वातावरण और लाइफस्टाइल के कारण शरीर में जमा हुए टॉक्सिंस को डिटॉक्स करना बहुत जरूरी है। अन्यथा यह बाद में सेहत को गंभीर रूप से प्रभावित कर सकते हैं। वहीं सही समय से बॉडी को डिटॉक्सिफाई कर लेने से आप लंबे समय तक स्वस्थ रह सकती हैं। साथ ही यह इंफेक्शन एलर्जी और विभिन्न प्रकार की बीमारियों की संभावना को कम कर देता है और वेट लॉस में भी आपकी मदद करता है। फ्रूट्स, वेजिटेबल, हर्ब्स, मसाले इत्यादि से तैयार ऐसी ही 5 तरह की चाय के बारे में जानते हैं, जो शरीर को डिटॉक्स करने में करेंगी आपकी मदद।

दालचीनी की चाय - दालचीनी सेहत के लिए कई रूपों में फायदेमंद होती है। यह हार्ट डिजीज की संभावना को कम कर देती है और शरीर में बैड कोलेस्ट्रॉल लेवल को भी नियंत्रित रखती है। इसी के साथ ब्लड प्रेशर को सामान्य रहने में मदद करती है। यह डायबिटीज से पीड़ित मरीजों के लिए काफी फायदेमंद हो सकती है। इसकी एंटीऑक्सीडेंट और एंटीमाइक्रोबॉयल प्रॉपर्टीज बॉडी को डिटॉक्स करके विभिन्न प्रकार की स्वास्थ्य समस्याओं की





संभावना को कम कर देती हैं। इसे बनाने के लिए आपको एक कप पानी में 3 से 4 दालचीनी के छोटे टुकड़ों को डालकर पानी मे 7 से 8 मिनट तक उबाल आने देना है। उसके बाद इसे छानकर निकाल लें और इसमें नींबू का रस निचोड़ कर पिएं।

हल्दी और अदरक की चाय - एंटी इन्फ्लेमेटरी और एंटीऑक्सीडेंट के गुणों से भरपूर हल्दी और अदरक की चाय आपकी इम्युनिटी को बूस्ट करने के साथ ही पाचन क्रिया को संतुलित रखने में मदद करतीहैं। वहीं यह इंफेक्शन से लड़ने की क्षमता को बढ़ा देती हैं और आंतों की सेहत के लिए भी काफी फायदेमंद होती हैं। यदि आप किसी प्रकार के दर्द से जूझ रही हैं तो यह दर्द और इन्फ्लेमेशन को कम करने में फायदेमंद होती है। इसे बनाने के लिए आपको एक कप पानी मे आधी उंगली के बराबर कसे हुए अदरक और चार चुटकी हल्दी डालनी है। फिर पानी में 10 मिनट तक उबाल आने दें। अब इसे छानकर निकाल लें और नींबू निचोड़ कर पिएं।

